POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६९ ● मुंबई, मंगळवार, २० जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईत बिहार भवन होऊ देणार नाही

### मनसेच्या नवनिर्वाचित नगरसेवकाने थोडपले दंड, थेट विरोध

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यात महापालिका निवडणुकांमध्ये यंदा सगळ्यांचं लक्ष मुंबई महापालिकडे लागले होते. मुंबईत ठाकरे बंधू एकत्र आल्याने यंदाच्या निवडणुकीत मराठीचा मुद्दा चांगलाच गाजला. त्यातच, राज ठाकरे यांनी मराठीच्या मुद्द्यावरुन, मुंबई गुजरातला नेण्यावरुन रान पेटवलं होतं. त्यामुळे, मराठी माणूस विरुद्ध परप्रांतीय असाच सामना महापालिका निवडणुकी रंगल्याचं दिसून आलं. मात्र, ठाकरे बंधूंना मुंबई महापालिका आपल्याकडे ठेवता आली नाही. मुंबई महापालिकेत भाजप सर्वाधिक जागांसह मोठा पक्ष ठरला, तर महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवलं. एकीकडे भाजपने मुंबई महापालिकेत वर्चस्व मिळवलं असताच, मुंबईत बिहार भवन उभारण्याची घोषणा नितीश कुमार यांच्या सरकारने केली आहे. मात्र, मनसेनं या बिहार भवनला विरोध केला असून बिहार भवन होऊ देणार नसल्याचे नवनिर्वाचित नगरसेवकाने म्हटलं आहे. बिहार सरकारने मुंबईत अत्याधुनिक आणि भव्य 'बिहार भवन' उभारण्याचा निर्णय घेतला असून, या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत बिहार राज्याची प्रशासकीय आणि सामाजिक उपस्थिती अधिक मजबूत करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. नितीश कुमार यांच्या नेतृत्वाखालील बिहार सरकारचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, तो पूर्ण झाल्यानंतर मुंबईतील बिहारवासीयांसाठी एक मोठे आधारकेंद्र ठरणार आहे. मात्र, आता या बिहार भवनला मनसेनं विरोध केला आहे. आम्ही मुंबईत बिहार भवन होऊ देणार नाही, महागाई वाढली आहे या गोष्टीकडे लक्ष द्यायचं सोडून नको त्या गोष्टीत पैसे घालवतात, अशा शब्दात मनसेच्या नवनिर्वाचित नगरसेवकाने बिहार भवनला थेट विरोध केला आहे. मुंबईत बिहार भवन बांधण्यापेक्षा बिहारमध्येच तुम्ही खर्च करा ना, इथे आमचे प्रश्न सुटत नाही, तुम्ही तुमचे प्रश्न सोडवा, असे यशवंत किल्लेदार यांनी म्हटलं. तसेच, निवडून आलेले नगरसेवक हे कट्टर आहेत, जे गद्दार आहेत ते आधीच निघून गेले आहेत. त्यामुळे, ऑपरेशन टायगर वगैरे सगळं फेल आहे, असे म्हणत कुठलाही नगरसेवक फुटणार नसल्याचेही किल्लेदार यांनी स्पष्ट केले.



**मुंबईत ३० मजली बिहार भवन**

प्रस्तावित बिहार भवन ३० मजली असणार असून, बेसमेंटसह या इमारतीची एकूण उंची सुमारे ६९ मीटर इतकी असणार आहे. ही इमारत पूर्णपणे आधुनिक वास्तूशैलीत उभारली जाणार असून, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जाणार आहे. सौर पॅनेल, पाण्याच्या शुद्धीकरणासाठी रळढ प्रकल्प, तसेच हिरवळीचे क्षेत्र या सुविधांचा समावेश करण्यात येणार आहे.

### महाराष्ट्र पोलिसांची मोठी कारवाई, भाजप कोणार्कचा हायव्होल्टेज ड्रामा

## भिवंडीत ४४ जणांना अटक, ४७० जणावंर गुन्हा दाखल

■**भिवंडी। प्रतिनिधी,**

भिवंडी महापालिकेतील कोणार्क विकास आघाडीचे विजय उमेदवार आणि माजी महापौर विलास पाटील यांच्या बंगल्यावर हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात माजी महापौर प्रतिभा पाटील जखमी झाल्या आहेत. जखमी प्रतिभा पाटील यांना उपचारसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. हल्ला करणारे आमदार महेश चौघुलेंच्या मुलाचे समर्थक असल्याचा आरोप होत आहे. या हल्यामुळे विलास पाटलांच्या समर्थकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठिय्या मांडला... पोलिसांकडून आंदोलकांवर लाठीचार्ज केल्याची माहिती समोर येत आहे. भाजप कोणार्क राड्या प्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. दोन्ही गटातील ४४ जणांना अटक करण्यात आली आहे. ४७० अनोळखी अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच दोन्ही गटातील १६-१६ कार्यकर्त्यां एफआयआर मध्ये नावे आहेत.

रविवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास माजी महापौर विलास पाटील यांच्या घरावर दगडफेक करण्यात आली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन्ही गटांमध्ये जोरदार दगडफेक झाली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचे पाहून पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी लाठीचार्ज केला. या घटनेनंतर पोलिसांनी पहाटेच कारवाई केली आणि विलास पाटील यांच्या बंगल्यावर उपस्थित असलेल्या ३६ जणांना ताब्यात घेतले. तसेच आमदार महेश चौगुले यांच्या गटातील आठ जणांनाही ताब्यात घेऊन संध्याकाळी भिवंडी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. यावेळी न्यायालयात पोलिसांकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आल्याने न्यायालयात छावणीचे स्वरूप निर्माण झाले होते.



रात्रीच्या वेळी झालेल्या या पोलिस कारवाई नंतर आमदार महेश चौघुले गटा कडून विलास पाटील गटावर चार गुन्हे दाखल करण्यात आले. तर माजी महापौर विलास पाटील यांनी महेश चौघुले यांच्या विरोधात दोन गुन्हे दाखल केले आहेत. परस्पर गुन्ह्यात दोन्ही गटाकडून जवळ-जवळ ४७० अनोळखी लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. मात्र या प्रकरणी दोन्ही गटातील १६-१६ आरोपीची नावे दाखल एफआयआर मध्ये दाखल केलेली आहेत.

दरम्यान, पोलिसांनी न्यायालयात हजर केलेल्या विलास पाटील गटातील ३६ आरोपींपैकी एकाही आरोपीचे नाव पोलीसानी दाखल केलेल्या एफआयआर मध्ये नाही. निव्वळ संशयावरून त्यांना कोर्टात हजर केले होते. तसेच विलास पाटील यांच्या समर्थकांवर चाकूने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले असताना देखील त्याचे कोणते ही वैद्यकीय प्रमाणपत्र पोलिसांनी कोर्टात सादर केले नाही. तसेच याप्रकरणी पोलिसांनी एकतर्फे भुमिका बजावली आहे. या प्रकरणी निपक्ष्यपाती तपास करण्यात यावा. तसेच वकील संघटने कडून जॉईट सीपी कडे मागणी करण्यात आली आहे की सदरचा तपास भिवंडी गुन्हे शाखेकडे देण्यात यावा. अशी माहीती विलास पाटील यांचे वकील नारायण आयर यांनी दिली.

## वाढवण बंदर प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करा! मच्छिमार, भूमिपुत्रांचे आंदोलन

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

जिल्ह्यातील प्रकल्पांविरोधात वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीच्या वतीने पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोचार्चे आयोजन करण्यात आले. वाढवण बंदर व जिल्ह्यात प्रस्तावित इतर प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करण्याची मागणी यावेळी मोर्चात सामील आंदोलनकर्त्यांकडून करण्यात आली. या मोर्चा दरम्यान हजारोच्या संख्येत मच्छीमार व भूमिपुत्र पुरुष व महिला उपस्थित होते. हा मोर्चा सोमवारी 19 जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता ठाणे जिल्हा मच्छीमार समाज हॉल, पालघर येथून सुरू होऊन जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत लाँग मार्च स्वरूपात काढण्यात आला. जिल्ह्यात होर्णाया सर्व प्रकल्पांमुळे स्थानिक मच्छीमार, शेतकरी, आदिवासी व भूमिपुत्रांचे अस्तित्व धोक्यात येत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. एकच जिद्द, विनाशकारी प्रकल्प हटवू! असा नारा देत सर्व मच्छीमार संघटना, शेतकरी संघटना, आदिवासी संघटना तसेच विविध प्रकल्पविरोधी सहकारी संघटनांनी या मोर्चात सहभाग दर्शवला.

प्रस्तावित 'वाढवण बंदर' प्रकल्प कायमस्वरूपी रद्द करावा आणि स्थानिक मच्छिमार, शेतकरी व भूमिपुत्रांचे घटनात्मक अधिकार सुरक्षित ठेवावेत, अशी ठाम मागणी करत वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीच्या वतीने मुख्यमंत्र्यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, हा प्रकल्प पर्यावरणविरोधी असून कायद्याच्या चौकटीतही बेकायदेशीर आहे. १९९८ साली सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थापन झालेल्या डहाणू पर्यावरण संरक्षण प्राधिकरणाने डहाणू हा 'इको-सेन्सिटीव्ह झोन' असल्याने येथे बंदर उभारणे पर्यावरणास घातक ठरेल, असा स्पष्ट आदेश दिला होता. केवळ प्रकल्पाची श्रेणी बदलून त्या बंदीला डावलणे हे कायद्याच्या ह्यरेस जुडीकाटाह्ल तत्त्वाचे उल्लंघन असल्याचे समितीने नमूद केले.

संविधानाच्या कलम २१ अंतर्गत सन्मानाने जगण्याचा व उपजीविकेचा अधिकार अबाधित राहिला पाहिजे. वाढवण बंदर उभारल्यास हजारो कुटुंबांचा पारंपरिक मासेमारी व्यवसाय उद्ध्वस्त होईल. 'ओल्गा टेलिस विरुद्ध मुंबई महानगरपालिका' या निकालाचा दाखला देत, उपजीविकेचा अधिकार हा जगण्याच्या अधिकाराचाच भाग असल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. तसेच 'पब्लिक ट्रस्ट डॉक्टीन'नुसार समुद्र व किनारपट्टी ही जनतेची संपत्ती असून सरकार फक्त विश्वस्त आहे. समुद्र बुजवून निसगार्चा समतोल बिघडवणे हे या सिद्धांताचे उल्लंघन ठरेल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या सामाजिक व पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकनात गंभीर त्रुटी असून जनसुनावणीत स्थानिकांच्या हरकतींकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप करण्यात आला. मच्छिमारांच्या पुनर्वसनाचा व भविष्यातील रोजगाराचा कोणताही ठोस आराखडा नसल्याचेही नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असताना 'राईट ऑफ वे'च्या नावाखाली काम रेटण्याचा प्रयत्न होणे हा न्यायालयाचा अवमान ठरू शकतो, असा इशाराही समितीने दिला आहे. या पार्श्वभूमीवर वाढवण बंदर प्रकल्पासहित जिंदाल मुरबे बंदर, रिलायन्स टेक्सटाईल पार्क प्रकल्प, समृद्धी महामार्ग व विमानतळासाठी होणारे जमीन अधिग्रहण, चौथी मुंबई प्रकल्प, शिप ब्रेकिंग यार्ड, नांदगाव आदी प्रकल्प त्वरित व कायमस्वरूपी रद्द करावा, अन्यथा लोकशाही मार्गाने आणि न्यायालयीन पातळीवर लढा तीव्र करण्यात येईल, असा इशारा वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीने दिला आहे.



**आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पालघरमध्ये आज आणि उद्या वाहतूक निर्बंध**

पालघर जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणाऱ्या मोर्चा व आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने शहरात विशेष वाहतूक नियंत्रण आदेश जारी केला आहे. हा आदेश दि. १९ व २० जानेवारी या कालावधीत लागू राहणार आहे. आंदोलनामुळे शहरात मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत पालघरमध्ये सर्व प्रकारच्या जड व अवजड वाहनांच्या प्रवेशावर बंदी घालण्यात आली आहे. बोईसर व मनोरकडून पालघरमध्ये येणारी तसेच पालघरहून बोईसर-मनोरकडे जाणारी जड वाहने शहरात प्रवेश करू शकणार नाहीत. या वाहनांसाठी पयार्यी मार्ग निश्चित करण्यात आले असून, वाहनचालकांनी ते मार्ग वापरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी पोलीस विभाग, वाहतूक शाखा व संबंधित प्रशासकीय यंत्रणांमार्फत करण्यात येणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. आंदोलन व यात्रेदरम्यान शहरातील वाहतूक सुरळीत राहावी आणि नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी सर्व वाहनचालक व नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

## पाकिस्तानच्या तुरुंगात भारतीय मच्छीमाराचा मृत्यू

■**पालघर। प्रतिनिधी,**

शिक्षेचा कालावधी संपून तब्बल साडेतीन वर्षे उलटूनही मुक्तता न मिळाल्याने पाकिस्तानच्या तुरुंगात असलेल्या एका भारतीय मच्छीमाराचा शुक्रवारी मृत्यू झाला. राष्ट्रीयत्व सिद्ध झाल्यानंतरही त्याला सोडण्यात आले नाही. या घटनेमुळे सीमारेषा चुकून ओलांडलेल्या निष्पाप मच्छीमारांचे प्राण किती काळ असेच जाणार, असा संतप्त सवाल उपस्थित झाला आहे. केंद्र सरकार यावर ठोस पावले उचलणार का, असा प्रश्न मच्छीमार कुटुंबांमधून व्यक्त होत आहे.तर पाकिस्तानच्या तुरुंगात काही भारतीय मच्छीमार आजारी असल्याची माहिती मिळत आहे, असे शांततावादी कार्यकर्ते जतीन देसाई यांनी सांगितले.



गुजरातच्या किनारपट्टीवर मासेमारी करताना अनेकदा बोटी चुकून पाकिस्तानच्या सागरी हद्दीत जातात. त्यावेळी पाकिस्तानची मेरीटाईम सिक्युरिटी एजन्सी मच्छीमारांना अटक करते आणि त्यांना कराचीतील तुरुंगात पाठवले जाते. सध्या पाकिस्तानच्या तुरुंगात महाराष्ट्रातील १९ जणांसह भारतातील एकूण १९९ मच्छीमार कैदेत आहेत. त्यापैकी अनेकांची शिक्षा तीन वर्षांपूर्वीच पूर्ण झाली आहे. तरीही त्यांची मुक्तता झालेली नाही. त्यामुळे या मच्छीमारांना मानसिक छळ सहन करावा लागत असून त्यांच्या कुटुंबांचीही ससेहोलपट होत आहे. घरातील कमावता सदस्य कैदेत असल्याने कुटुंबांचा उदरनिर्वाह ठप्प झाला आहे. कर्ता पुरुष नसल्याने अनेक कुटुंबे नैराश्यात जगत आहेत. शिक्षा पूर्ण झाल्यानंतरही कैदेत असलेल्या मच्छीमारांच्या सुटकेसाठी महिनाभरापूर्वी काही कुटुंबीयांनी परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेतली होती आणि आपल्या आप्तांना मायदेशी परत आणण्याची विनंती केली होती. मात्र अद्याप परराष्ट्र विभागाकडून ठोस हालचाल दिसून आलेली नाही. भारत सरकारने या प्रकरणात गांभीयार्ने लक्ष घालून पाकिस्तानच्या कैदेत असलेल्या भारतीय मच्छीमारांची लवकरात लवकर सुटका करण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी जतीन देसाई यांनी केली आहे.

## अक्कलकोटला जाताना पनवेलच्या भाविकांवर काळाचा घाला

■**सोलापूर। प्रतिनिधी,**

पनवेलहून अक्कलकोटला स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांचा पुणे-सोलापूर महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात दुदैर्वी मृत्यू झाला आहे. शनिवारी रात्री ११.४५ वाजताच्या सुमारास मोहोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत देवडी पाटीजवळ झालेल्या या अपघातात सहापैकी पाच जण जागीच ठार झाले आहेत.

एर्टिगा वाहनचालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्यामुळे कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर आदळली. या अपघातात एक महिला प्रवासी गंभीर जखमी झाली असून, तिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. रवी साळवे (वय ६०), अर्चना तुकाराम भंडारे (४७), विशाल नरेंद्र भोसले (४१), अमर पाटील, आनंद माळी अशी मृतांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पुणे-सोलापूर महामार्गावर देवडी पाटीजवळ हे मित्र कारमधून जात असताना वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे कार मोठ्या झाडाला आदळली. कारमध्ये तीन पुरुष आणि तीन महिलांचा समावेश होता. या भीषण अपघातात ३ पुरूष आणि २ महिलांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती. मोहोळ पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी जखमी ज्योती जयदार टकले या महिलेला रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. त्यांची प्रकृती स्थिर आहे.



अपघात इतका भीषण होता की, कारचा चुराडा झाला. मृतदेह कारमध्ये चेंदामेंदा झालेल्या अवस्थेतून बाहेर काढण्यात आले. कार हायवेपासून १० ते १५ फूट अंतरावर झुडुपांमध्ये अडकली होती. अपघातग्रस्त वाहन रस्त्यावरून हटवण्यात आले असून पुढील तपास मोहोळ पोलीस स्टेशनमधील पोलीस निरीक्षक शेडगे करत आहेत.

### डीजीपींचा आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल

## आयपीएस अधिकाऱ्यानं दिलं स्पष्टीकरण

■**मुंबई । प्रतिनिधी,**

बेंगलोरमधील गोल्ड स्मगलिंग प्रकरणातील आरोपी रान्या रावचे वडील डीजीपी रामचंद्र राव यांचा आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाला आहे. यामुळे कर्नाटकमध्ये चांगलीच खळबळ माजली आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून राव यांच्याविरोधात कडक कारवाई होण्याची शक्यता आहे. दरम्यान, हा व्हिडिओ मॉर्फ केलेला असल्याचे राव यांनी सांगितले आहे. ते सध्या बेंगलोर येथील नागरी हक्क अंमलबजावणी संचालनालयाचे महासंचालक म्हणून कार्यरत आहेत.

**व्हिडिओत नेमकं काय आहे?**

राव यांचा हा आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर कर्नाटकात खळबळ माजली आहे. यामध्ये राव हे सरकारी ऑफिसमध्ये आणि गणवेशात असल्याचे दिसून येत आहे. यामधील महिलेला मीठी मारत असताना आणि तिचे चुंबन घेत असताना ते दिसत आहेत. गुप्तपणे रेकॉर्ड करण्यात आलेला हा व्हिडिओ असल्याचे बोलले जात आहे. या व्हिडिओमुळे कर्नाटकच्या राजकीय आणि प्रशासकीय विश्वात मोठी खळबळ उडाली आहे.



**कर्नाटकचे मुख्यमंत्री संतापले**

या प्रकरणामुळे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामैय्या संतापले आहेत. या प्रकरणाची त्यांनी सविस्तर माहिती घेतली असून राव यांच्याविरोधात कडक कारवाई करण्यात येणार असल्याची चर्चा रंगली आहे. गोल्ड स्मगलिंग प्रकरणातील आरोपी रान्या रावचे ते वडील असल्याने याची जोरदार चर्चा रंगली आहे. दरम्यान, प्रशासनाकडून या व्हिडिओची सत्यता तपासली जात आहे. मात्र या सर्व प्रकारामुळे पोलिसांच्या नैतिकतेविषयी प्रश्न विचारले जात आहेत.

**व्हिडिओ मॉर्फ असल्याचा राव यांचा दावा**

इंडिया टुडेशी बोलताना राव यांनी सांगितले की, हा व्हिडिओ मॉर्फ केलेला आहे. माझी बदनामी करण्यासाठी कुणीतरी मुद्दाम हे घडवून आणले आहे. काही लोक मला जाणून-बुजून त्रास देत आहेत. दरम्यान, या प्रकरणामुळे पोलिस खात्यातील शिस्त आणि नैतिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वेगवेगळ्या प्रसंगी महिला त्यांच्या कार्यालयात वेगवेगळे कपडे घालून येत असत.

## श्रवण दास महाराजाचा कारनामा! लग्नाचे अमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

■**मुंबई । प्रतिनिधी,**

बिहारच्या मिथिलांचलमध्ये धर्म आणि आस्थेच्या आड लैंगिक अत्याचाराचे प्रकरण उघडकीस आले आहे. येथील एका सुप्रसिद्ध कथा वाचकाने अल्पवयीन मुलीला आपल्या जाळ्यात ओढून तिच्यासोबत लैंगिक संबंध ठेवले. इतकेच नाही तर ती मुलगी गर्भवती झाल्यानंतर तिचा गर्भपातही केला. मुलीने लग्नासाठी तगादा लावल्यानंतर कथावाचकाने एका बंद खोलीत लग्नही केले. मात्र हे लग्न सार्वजनिक करण्यास त्याने नकार दिल्यानंतर मुलीने पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर या बाबाला अटक करण्यात आली आहे. श्रवण दास महाराज असं या कथावाचक बाबाचं नाव आहे.



**लग्नाच्या अमिषाने शारिरीक संबंध**

मिळालेल्या माहितीनुसार, श्रवण दासचं त्या मुलीच्या घरी येणं-जाणं होतं. या दरम्यान दोघांची ओळख झाली आणि ते एकमेकांच्या जवळ आले. यानंतर महाराजाने मुलीसोबत लैंगिक संबंध ठेवण्यासही सुरुवात केली. यातच ती मुलगी गर्भवती राहिली. मात्र गोड बोलून तिचा गर्भपात केला गेला. मुलीचं लग्नाचं वय झाल्यानंतर लग्न करण्याचं अमिष त्यानं तिला दाखवलं. मुलीने दबाव वाढवल्यानंतर एका बंद खोलीत त्याने तिच्याशी लग्न केलं. मात्र हे लग्न सार्वजनिक करण्यास त्याने नकार दिला. अनेकदा पंचायत होऊनही महाराजाने तिचा बायको म्हणून स्वीकार करण्यास नकार दिला.

**लग्नाचा व्हिडिओ आला समोर**

या प्रकरणी कथावाचक श्रवणदास आणि त्या अल्पवयीन मुलीचा एका खोलीत लग्न करत असतानाचा व्हिडिओ समोर आला आहे. या व्हिडिओत श्रवणदास त्या मुलीच्या कपाळावर सिंदूर लावताना स्पष्टपणे दिसत आहे. हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. यानंतर या प्रकरणाचं गांभीर्य वाढल्यानं पोलिसांनी तातडीची कारवाई केली आहे.

**पोलिसांनी अटक करताच जोडले हात**

याप्रकरणी एफआयआर दाखल झाल्यानंतर दरभंगा पोलिसांनी बाबाला अटक केली आहे. त्यासाठी खास पोलिसांची एसआयटी स्थापन करण्यात आली. एका गुप्त माहितीच्या आधारे, कथाकार श्रवण दासला हाऊसिंग बोर्ड कॉलनीतून अटक केली. चौकशीनंतर त्याला तुरुंगात पाठवण्यात आले आहे. दरम्यान, पोलिस त्याला घेऊन जात असताना कॅमेऱ्यासमोर हात जोडत आपण निर्दोष असल्याचं बाबाने सांगितलं. श्रवण दासने आठव्या वर्षी घर सोडून मौनी बाबांसोबत राहण्यास सुरुवात केली. यानंतर त्याने पीएचडीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. गेल्या १० वर्षांपासून तो कथा वाचन करत आहे.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## सत्तेत आलो... पण हिंदुत्व?



**१६ जानेवारी २०२६ या दिवशी महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा निकाल लागला आणि महायुतीची २५ महानगरपालिकांवर सत्ता आली. याचा अर्थ २५ महानगरपालिकांवर महायुतीचा महापौर विराजमान होईल.**

४ महानगरपालिकांमध्ये काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांना अटीतटीच्या लढतीमध्ये बहुमत प्राप्त झाले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची तर अगदीच नाचक्की झाली. महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये हिंदुत्वनिष्ठ पक्ष सत्तेत येणे आणि हिंदुत्वाचा द्वेष करणाया, हिंदु आतंकवादाचे खोटे कथानक निर्माण करणाया पक्षांना जनतेने नाकारले, ही एक चांगली बाजू आहे; परंतु या निवडणुकीत पुढे आलेली काही सूत्रे हिंदूंना विचार करायला लावणारी आहेत. वर्ष २०१७ मध्ये ५६ नगरसेवक असलेल्या 'एम्.आय.एम्.'चे या निवडणुकीत १२५ नगरसेवक निवडून आले आहेत. या निवडणुकीत केवळ 'एम्.आय.एम्.'च्याच जागा वाढल्या असे नाही, तर 'एम्.आय.एम्.'च्या व्यतिरिक्त ज्या ठिकाणी हिंदुत्वनिष्ठ पक्षाचा उमेदवार निवडणूक लढवत होता, त्याला टक्कर देणाऱ्या उमेदवाराला मुसलमानांची मते अगदी नियोजनबद्ध पडली. 'एम्.आय.एम्.'सह महाविकास आघाडीतील अन्य पक्षांनीही मुसलमानबहुल भागांमध्ये मुसलमान उमेदवार उभे केले होते. त्याचा परिणाम म्हणजे वर्ष २०१७ च्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत सर्व पक्षांचे मिळून साधारणपणे १२९ मुसलमान नगरसेवक निवडून आले होते. वर्ष २०२६ च्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत मुसलमान नगरसेवकांची संख्या २०० च्या वर गेली आहे. राज्याच्या एकूण टक्केवारीच्या तुलनेत ही संख्या अल्प आहे; परंतु मुसलमानांच्या एकगठ्ठा मतांनीच हे मुसलमान नगरसेवक निवडून आले आहेत. भारतामध्ये निवडणुका या भावनात्मक सूत्रावर अधिक होतात. त्यामुळे ज्या समाजाचा उमेदवार असेल, त्या समाजाची मते त्या उमेदवाराला जाण्याची शक्यता अधिक असते. त्याप्रमाणे मुसलमानांनी त्यांची एकगठ्ठा मते मुसलमान उमेदवाराला दिली, तर त्यात चुकीचे ते काय? धर्मनिरपेक्ष देशात लोकशाही मार्गाने मुसलमान नगरसेवक निवडून येणे किंवा सत्तेमध्ये मुसलमान येणे, हे काही राज्यघटनेच्या विरोधात नाही. असे असले, तरी मुसलमान बहुसंख्येने निवडून आल्यास किंवा सत्तेमध्ये प्रस्थापित झाल्यास 'ते राज्यघटनेला मानतील', याची शाश्वती कुणी देऊ शकेल का? अर्थात् याचे उत्तर 'नाही' हेच आहे. मुसलमान सत्तेत आल्यास 'भारतामध्ये शरीयत लागू होईल', हे कुणी तज्ज्ञांनी सांगण्याची आवश्यकता नाही. धर्मांध मुसलमानांच्या सत्तेतील समावेशामुळे राष्ट्रीयत्वाला धोका येणार. यासाठीच हिंदूंनी जागरूक होणे आवश्यक आहे. या निवडणुकीमध्ये हिंदुत्वनिष्ठ पक्ष प्रबळ ठरले असले, तरी बहुसंख्य हिंदू मतदानासाठी बाहेरच पडले नाहीत, ही वस्तूस्थिती आहे. वर्ष २०२४ च्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत हिंदूंच्या वाढलेल्या ९-१० टक्क्यांमुळे हिंदुत्वनिष्ठ पक्षांना अनेक जागांवर लाभ झाला होता; परंतु हिंदूंच्या मतांचा टक्का वाढत नाही, ही वस्तूस्थिती आहे. वर्ष २०१७ च्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत ५६.३३ टक्के मतदान झाले होते, तर या निवडणुकीत ५४.७७ टक्के मतदान झाले. या निवडणुकीत मतांची टक्केवारी घटली असली, तर मुसलमानबहुल क्षेत्रांत मतांची टक्केवारी अधिक आहे. यातून 'मुसलमानांचे मतदान धर्मासाठी होत आहे, त्या तुलनेत हिंदू मात्र मतदान करण्यासाठी तेवढ्या प्रमाणात उत्साही दिसत नाहीत', हेच लक्षात येते. ही स्थिती पहाता हिंदुत्वनिष्ठ पक्ष सत्तेत येणे, हा विजय वाटत असला, तरी वरील सूत्रे गांभीर्याने विचार करायला लावणारी आहेत. हिंदुत्वनिष्ठ पक्ष सत्तेत येणे आणि राजकारण हिंदुत्वाला केंद्रीभूत होणे, ही दोन्ही सूत्रे वेगवेगळी आहेत. राज्यात सत्ता स्थापन करण्यामध्ये हिंदुत्वनिष्ठ पक्ष निश्चितच यशस्वी झाले आहेत; परंतु 'राजकारणामध्ये हिंदुत्वाचा अर्थात् हिंदु संस्कृती, सनातन संस्कृती केंद्रभूत करण्याचा टप्पा अद्यापही गाठायचा आहे', हे हिंदुत्वनिष्ठांनी लक्षात घ्यायला हवे. अर्थात हिंदुत्वनिष्ठ पक्ष सत्तेत आल्यामुळे हिंदुत्व निश्चितच बळकट होईल; परंतु हा एक टप्पा झाला. येत्या काळात हिंदुत्वाला केंद्रबिंदू मानून राजकारण होणे, हा दुसरा टप्पा अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. त्यामुळे येत्या काळात हिंदुत्वनिष्ठ पक्षांनी हिंदुत्वाला धरून राजकारण करावे, यासाठी हिंदूंनी जागरूक रहाणे आवश्यक आहे. हिंदू मतदानासाठी बाहेर पडत नाहीत, याचा अर्थ राजकारणात असलेल्या हिंदुत्वनिष्ठ पक्षांविषयी त्यांना विश्वास वाटत नाही किंवा हिंदुत्वाविषयी ते सजग नाहीत. हिंदुत्व हा सत्तेचे केंद्रबिंदू होण्यासाठी या दोन्ही बाजूंविषयी कृतीशीलता आवश्यक आहे. महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्यापासून ते ग्रामपंचायती यांमध्ये स्थानिक नागरिकांची मानसिकता दिसून येते. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये मुसलमानांनी भाजपच्या विरोधातील प्रभावी पक्ष म्हणून काँग्रेसच्या बाजूने मतदान केले. महाराष्ट्राच्या विधानसभेच्या निवडणुकीत शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महायुतीच्या विरोधातील प्रबळ पक्ष म्हणून उद्धव बाळासाहेब ठाकरे अन् राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षांना बळ दिले; परंतु महानगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मात्र कुणा एका पक्षाच्या पारड्यात मते न देता हिंदुत्वनिष्ठ पक्षांच्या विरोधातील उमेदवारांना मतदान केल्याचे दिसून येते. छत्रपती संभाजीनगर, मालेगाव या ठिकाणी मुसलमानांनी काँग्रेसऐवजी प्रभावी असलेल्या 'एम्.आय.एम्.'च्या उमेदवारांना मते दिली. मुंबईमध्येही ज्या ठिकाणी 'एम्.आय.एम्.'ची शक्ती अल्प होती, तेथे मुसलमानांनी काँग्रेस किंवा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांना मतदान केले आणि जेथे बलिष्ठ होते, तेथे 'एम्.आय.एम्.'च्या उमेदवाराला मतदान केले. 'एम्.आय.एम्.'मुळे काँग्रेस, समाजवादी आणि अन्य काही पक्षांची मते फुटली. त्याचा लाभ हिंदुत्वनिष्ठ पक्षांना झाला; परंतु मुसलमानांची मते मात्र कट्टरतावादाकडे जात आहेत. ही भविष्यातील धोक्याची घंटा आहे. आपली भाकरी परक्याच्या चुलीवर भाजण्यापेक्षा स्वतःची चूल का नको? या विचाराने महानगरपालिकेच्या निवडणुकीत मुसलमानांनी मते 'एम्.आय.एम्.'कडे वळवली. 'त्या तुलनेत हिंदू मात्र मतदानासाठी उत्साही का नाहीत?', याचा विचार सत्तेत आलेल्या हिंदुत्वनिष्ठ पक्ष आणि हिंदु समाज या दोघांकडूनही होणे आवश्यक आहे.



## 'देवा' भाऊंच्या मनात...

देशातील सर्वात मोठी महापालिका असा लौकीक असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत यंदा ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग लागला. भाजप महायुतीचा महापौर बसेल हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. 'देवा'भाऊंच्या मनात असेल तोच महापौर होईल. अशी राजकीय वतुर्ळातील चर्चा आहे.

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका निवडणुकींचा निकाल दोन दिवसांपूर्वी जाहीर झाला. पुन्हा एकदा भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला. एवढंच नव्हे तर महापालिकांच्या एकूण २८६९ प्रभागांतून भाजपचे १४२५ नगरसेवक निवडून आले. भाजपच्या विजयी नगरसेवकांचा आकडा सर्वाधिक आहे. त्या खालोखाल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला यश मिळाले. त्यांचे ३३९ नगरसेवक निवडून आले. तिसऱ्या क्रमांकावर काँग्रेस असून, त्यांची संख्या ३३४ आहे. राज्यात महायुतीत सत्तेत असलेल्या अजित पवारांच्या राष्ट्रवादीने अनेक ठिकाणी भाजपला आव्हान देण्याचा प्रयत्न केला. पुणे-चिंचवड महापालिकेत विरोधकांशी हातमिळवणी केली. त्यातून त्यांना १६७ नगरसेवकांना निवडून आणण्यात यश लाभले. या महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडी म्हणून लढताना अपवादात्मक स्थितीत पाहायला मिळाले. महायुतीतील भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांचा राज्यात बोलबाला होता. याआधी झालेल्या नगर परिषद, नगर पंचायतीच्या निवडणुकीतही विरोधक लढताना कुठे दिसले नाहीत. त्यामुळे सत्ताधारी पक्षांचे जे उमेदवार बिनविरोध निवडून आले, त्यांच्यावर टीका करत, रडीचा डाव खेळण्याचा प्रयत्न विरोधकांनी केला. महापालिका निवडणुकीत निवडून आलेल्या ६६ उमेदवारांच्या निकालाला स्थगिती द्यावी यासाठी विरोधकांकडून उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठवण्यात आले; परंतु त्यांच्या याचिका फेटाळून लावल्या. सत्ताधाऱ्यांपुढे आपली डाळ शिजणार नाही म्हणून निवडणुकीच्या आधीपासून निवडणूक आयोगापुढे प्रश्नचिन्ह उभे करून त्यांच्यावर संशयाच्या नजरेतून आरोप केले; परंतु निकालाची प्रक्रिया पार पडताना, राज्यभरात कुठेही राज्य निवडणूक आयोगाला आरोपींच्या पिंजऱ्यात पकडता यावे, अशी संधी विरोधकांना मिळाली नाही.

देशातील सर्वात मोठी महापालिका असा लौकीक असलेल्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत यंदा ठाकरेंच्या सत्तेला सुरुंग लागला. भाजप महायुतीचा महापौर बसेल हे सांगायला कोणा ज्योतिषाची गरज नाही. २२७ सदस्य संख्या असलेल्या मुंबई महापालिकेत भाजपचे सर्वाधिक ८९ नगरसेवक निवडून आले आहेत. शिंदे यांच्या शिवसेनेच्या २९ नगरसेवकांची जोड मिळाल्याने बहुमताचा ११४ चा जादुई आकडा महायुतीने पार केला आहे. महाराष्ट्रातील अन्य महापालिकेत सत्ता मिळो ना मिळो, पण मुंबई महापालिकेत कोणत्याही परिस्थितीत सत्ता हवीच, यासाठी उबाठाने रणनीती आखली होती. मराठी अस्मिता, मराठी माणूस या मुद्यांवर भावनिक साद घालत २० वर्षापासून अलिप्त राहिलेले ठाकरे बंधू एकत्र आले होते. सोन्याची अंडी देणारी कोंबडी म्हणून उल्लेख केला जातो, ती मुंबई महापालिका ठाकरे बंधूंच्या हातातून निसटली. २५ वर्षे मुंबई महापालिकेत सत्तेवर असताना, मराठी माणसाचे हित पाहिले असते, तर मराठी माणूस मुंबईबाहेर हद्दपार झाला नसता, याचे आत्मचिंतन करण्याची वेळ ठाकरे बंधूंवर आली आहे. मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होणार? मुंबई उद्योगपतींच्या घशात घालण्याचा कट? असा विखारी प्रचार ठाकरे बंधूंकडून करण्यात आल्यानंतर त्याचा काहीही उपयोग झाला नाही. मुंबई महापालिकेत सर्वपक्षीय १४७ मराठी भाषिक नगरसेवक निवडून आले आहेत. त्यात भाजपच्या ८९ पैकी ५६ नगरसेवकांचा समावेश आहे. महायुती सत्तेवर आली, तर हिंदू मराठी महापौर बसेल अशी स्पष्ट भूमिका भाजपने निवडणूक प्रचारात जाहीर केली होती. मराठी-अमराठी असा भेद न करता केवळ मुंबईच्या विकासाचे 'व्हिजन' घेऊन महायुतीने प्रचार केला होता. कोस्टल रोड, मेट्रोसारख्या प्रकल्पाचे केलेले काम जनतेपुढे ठेवल्याने मुंबईतील जेनझी (तरुण) हा महायुतीच्या पाठिशी उभा राहिला हे निकालातून स्पष्ट झाले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा गद्दार असा उल्लेख करत त्यांना हिणवण्याचा वारंवार प्रयत्न केला. निकालानंतर आता उबाठाची भाषा बदललेली दिसत आहे. शिंदे यांच्या शिवसेनेचे २९ नगरसेवक आपल्यासोबत आले तर, सत्तेचे स्वप्न पुरे होईल, अशी भाबडी आशा उबाठाला वाटत आहे. मातोश्रीवर भेटीसाठी आलेल्या नवनिर्वाचित नगरसेवकांना संबोधताना उबाठा सेनेच्या पक्ष प्रमुखाने 'देवाच्या मनात असेल तर महापौर आमचाच होईल' असे विधान करून भ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीचा महापौर होणार ही देवाची इच्छा आहे, अशी प्रतिक्रिया देऊन या चर्चेला पूर्णविराम दिला आहे. तरीही 'देवा'भाऊंच्या मनात असेल तोच महापौर होईल. अशी राजकीय वतुर्ळातील चर्चा आहे; परंतु यानिमित्ताने सत्तेसाठी उबाठा किती लाचार आहे हे जनतेला आता कळून येत आहे. 'सूर्याजी पिसाळ', 'जयचंद', 'गद्दार', 'नकली' अशा अनेक उपमा देऊन एकनाथ शिंदे यांना हिणवण्यात आले होते. आता त्याच एकनाथ शिंदे यांच्यासाठी उबाठा पायघड्या घालत आहे, अशी भाषा उबाठाच्या नेत्यांकडून येत आहे. मुंबई महापालिकेत शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना 'किंग मेकर'च्या भूमिकेत आली आहे. त्यामुळेच की काय, आता उबाठाकडून त्यांना चुचकारण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला आहे असे चित्र दिसत आहे. राज्यात दोन ब्रँडची चर्चा होती, त्या ठाकरे आणि पवार ब्रँडच्या निकालानंतर बोऱ्या वाजल्याचे स्पष्ट झाले. संपूर्ण राज्यात उबाठाचे फक्त १५५ नगरसेवक निवडून आले, तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे ३६ नगरसेवक निवडून आले आहेत. मुंबईत बहुमताचा आकडा नसतानाही सत्ता मिळावी अशी दिवसाउजेडा उबाठाच्या नेत्यांना स्वप्ने पडत असतील, तर तो आनंद त्यांना घेऊ दे! यापुढे त्यांच्याकडे दुसरे काही उरलेले नाही, असेच म्हणावे लागेल.

## आता विकासाचे बोला...




महानगरपालिका निवडणुकांचा गदारोळ संपला, निकाल लागले आणि विजयी उमेदवारांच्या गळ्यात हार पडले. पण आता मतदारांचा सवाल बदलला आहे. प्रचारात 'विकास' हा शब्द वारंवार ऐकू आला; मात्र प्रत्यक्षात तो कधी आणि कसा दिसणार, हा प्रश्न सामान्य नागरिक विचारू लागला आहे.
विजयाचा जल्लोष क्षणिक असतो, पण जबाबदारी मात्र पाच वर्षांची असते. म्हणूनच आजपासूनच नव्हे, तर आत्ताच नवनिर्वाचित नगरसेवकांनी विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज आहे, कारण आता ते पक्षाचे नाही, तर प्रभागातील प्रत्येक नागरिकाचे प्रतिनिधी आहेत.

महाराष्ट्र राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत विकासाला मत द्या म्हणून मतदार राजाला साद घालणारे उमेदवार निवडून आल्याने 'आता विकासावर बोला' असे प्रभागातील सुजाण नागरिक म्हणू लागले आहेत. तेव्हा काल जरी विजयाचा गुलाल उधळला तरी उद्या म्हणण्यापेक्षा आजपासून विकासकामांना नवनिर्वाचित नगरसेवकांना सुरुवात करावी लागेल. कारण आता ते एका पक्षाचे नसून प्रभागाचे नगरसेवक आहेत याची जाणीव असायला हवी. जवळजवळ नऊ वर्षांनंतर निवडणुका होत आहेत हे सुद्धा लक्षात ठेवायला हवे.

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्या १५ डिसेंबर, २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम सन २०२५-२६ जाहीर झाला. त्यानंतर सर्वप्रक्रिया होऊन निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली. यात राज्यातील २७ महानगरपालिकांची मुदत संपली होती, तर जालना व इचलकरंजी येथील दोन महानगरपालिका नवनिर्मित होत्या. राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होऊन १६ जानेवारीला निकाल सुद्धा लागला. म्हणजे गुलाल कोण उधळणार याचे उत्तर सुद्धा मतदार राजाला काल मिळाले. तेव्हा मतदान झाले, निकाल लागला, 'आता विकासाचे बोला' असे मतदार राजा व नागरिक नवनिर्वाचित नगरसेवकांना म्हणत आहेत. त्यामुळे राजकीय पक्ष आणि त्या पक्षातून निवडून आलेले नगरसेवक यांनी आपल्या जाहीरनाम्यात दिलेल्या वचनांची पूर्तता करण्यासाठी विकासकामांना गती दिली पाहिजे. ते सुद्धा निःपक्षपातीपणे सार्वजनिक काम करायला हवे. जरी मी पक्षाचा सभासद असलो तरी लोकप्रतिनिधी आहे. लोकांनी मला निवडून दिले आहे.

तेव्हा लोकांच्या कल्याणासाठी मी काम करेन ते सुद्धा भारतीय संविधानानुसार, देशातील लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी. तरच आपल्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात निवडून आलेल्या प्रभागाचा सर्वांगीण विकास होण्याला मदत होईल. निवडून आलेल्या नगरसेवकांमधून 'महापौर' निवडला जातो. महापौर प्रमुख असतात, तर प्रशासकीय अधिकारी म्हणून महापालिका आयुक्त काम पाहतात. ज्या शहराची लोकसंख्या दहा लाखांपेक्षा जास्त असते अशा शहरी क्षेत्राचे व्यवस्थापन महापालिकेमार्फत करण्यात येते. शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन त्यांना विकासात्मक विविध सेवा पुरविण्याचे काम महापालिका करीत असते. शहराचे विकासाच्या दृष्टिकोनातून विकास आराखडा तयार करणे, शहरातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी देणे, रस्ते वाहतूक व्यवस्थित करणे, योग्य ठिकाणी नाला किंवा नद्यांवर पूल बांधणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटारे बांधणे, वीजपुरवठा पुरविणे, शहरातील प्रत्येक विभागामध्ये मोफत आरोग्य सेवा देणे, वाहतूक सेवा, घनकचरा विभागामार्फत कचऱ्याची विल्हेवाट लावणे, सुखा कचरा आणि ओला कचरा स्वतंत्र डब्यात गोळा करणे, मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण देऊन महानगरपालिकेमार्फत शाळा चालविणे. यासाठी विविध नागरी सेवेतून उत्पन्न मिळविले जाते. यात मालमत्ता उत्पन्न कर नागरिकांकडून गोळा करणे, पाणीपट्टी, दंड वसुली आणि राज्य सरकारचे अनुदान इत्यादी मार्गाने उत्पन्न मिळवून ही स्वायत्त संस्था आपली विविध कामे करीत असते. आता निवडून आलेल्या नगरसेवकांना वचनपूर्ती करावी लागेल. राज्यात २९ शहरांमध्ये महानगरपालिका असल्या तरी त्याची फारशी स्वच्छता दिसत नाही. जरी असली तरी स्वच्छतागृह फारच अस्वच्छ असतात. त्याकडे लक्ष देणे गरजचे आहे. कोविडमध्ये त्याचा सर्वांना अनुभव आला असेल. तेव्हा सुंदर शहरासाठी स्वच्छता अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा घनकचरा व्यवस्थापकांनी कामामध्ये सतर्क राहावे लागेल. त्यावर करडी नजर नगरसेवकांना ठेवावी लागणार आहे.

आपली मातृभाषा मराठी आहे. महापालिकेच्या शाळा बंद पडत चालल्या आहेत. काही ठिकाणी शाळेत मुलेच नाहीत अशी परिस्थिती दिसते. ही मराठीच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. तेव्हा मराठी शाळेची घंटा रोज वाजली पाहिजे. तरच मराठी भाषेला मानाचे पान मिळेल. सध्या राज्यात रोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या आनुषंगाने रिकाम्या हातांना रोजगार मिळाला पाहिजे. तो सुद्धा कायमस्वरूपात असावा. अजूनही अनेक शहरात स्वच्छ आणि पुरेसे पाणी नागरिकांना मिळत नाही. तेव्हा स्वच्छ पाणी नागरिकांना कसे मिळेल या दृष्टिकोनातून प्रयत्न करावा. अनेक ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असून पूर्ण झालेले नाही. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शहरातील सार्वजनिक बससेवा सुरळीत चालली पाहिजे ती सुद्धा फायद्यात. कारण ती त्या शहराची जीवनवाहिनी असते. त्यात डबलडेकरच्या बससेवा आणि आताच्या आधुनिक बससेवा तोट्यात चालत आहेत. त्यावर योग्य ती उपाययोजना होणे गरजेचे आहे. तसेच वाढत्या विजेच्या दराकडे सुद्धा लक्ष द्यायला हवे. यात सर्वसाधारण नागरिकांना जास्त भाडेवाडीची झळ पोहोचते. निवडणूक काळात लाडक्या बहिणींना आचारसंहितेमुळे अग्रिम लाभापासून वंचित राहावे लागले होते त्यांचे सुद्धा सक्षमीकरण आता झाले पाहिजे. शहरातील पादचाऱ्यांसाठी असणाऱ्या फुटपाथवर अतिक्रमण झालेले आहे ती जागा मोकळी करणे. त्यात फेरीवाले, दुकानानजीक अवैद्य धंदे, बांधकाम व गाड्या उभ्या करणे यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होत असते. यातून मोकळा श्वास घेण्यासाठी नगरसेवकांनी पुढाकार घ्यावा. महत्त्वाची बाब म्हणजे, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जे अतिक्रमण झालेले आहे त्यावर सुद्धा निर्बंध घालावे लागतील.

शहरात मध्यभागी क्रीडा संकुल ज्या ठिकाणी नाहीत त्या ठिकाणी बांधण्यात याव्यात. तेव्हा राज्यातील २९ महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवकांना मतदार राजाने उमेदवाराच्या नावाच्या समोर असणाऱ्या चिन्हाच्या समोरील बटण दाबून विजयी करून दिले आहे. त्यामुळे आपल्या प्रभागातील मतदार राज्याला नगरसेवकांना 'आता विकासाचे बोला' अशी वेळ बोलण्याची येण्यापूर्वी नागरिकांच्या विकासासाठी विकासकामे हाती घ्यावी लागतील.

## कोकणात महायुतीची मोर्चेबांधणी...!




**कोणत्याही निवडणुका लढविण्यासाठी आवश्यक असते ते कार्यकर्त्यांचे पाठबळ. महाविकास आघाडीकडे कार्यकर्तेच दिसत नाहीत आणि उरलेही नाहीत. शेवटी सत्तेच्या विरोधात किती काळ विरोधी पक्षाची भूमिका घेऊन उभं राहायचं, असा प्रश्न कार्यकर्त्यांना सातत्याने संभ्रमित करतो. याच संभ्रमावस्थेत कोकणातील महाविकास आघाडी मुंबईसह राज्यातील विविध महानगरपालिका निवडणुकीत दुभंगली आहे. पार पडलेल्या निवडणुकीत 'एकला चलो रे'चा नारा देत महाविकास आघाडीतील घटक पक्षांची वाटचाल सुरू असल्याने साहजिकच या निवडणुकीत कोकणात तरी भाजप, शिवसेना(शिंदे) गट, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवारगट) आरपीआय या घटक पक्षांच्या महायुतीसमोर आव्हान उभे करण्याची मानसिकता महाविकास आघाडीमध्ये नाही. त्या तुलनेत महायुतीच्या मोर्चेबांधणीने कमालीचा वेग घेतला आहे...**

महाराष्ट्रातील महानगरपालिकांच्या निवडणुकीचे निकाल भारतीय जनतापक्ष, शिवसेना महायुतीच्या बाजूने लागले आहेत. महानगरांच्या निकालात राज्यातील शहरी जनतेचा कौल महायुतीच्या बाजूने लागलेला असताना आता राज्यात पहिल्या टप्प्यातील ५ जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. त्यामुळे आता जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या तयारीला, मोर्चेबांधणीला सुरुवात झाली आहे. राज्यातील कोकण भागात झालेल्या नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीतही कोकण महायुतीच्यासोबत राहिले आहे. कोकणामधील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर या जिल्ह्यांमध्ये महायुतीच्या माध्यमातून निवडणुका होतील असे अपेक्षित आहे. रायगड जिल्ह्यात महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवारगट) व शिवसेना (शिंदेगट) यांच्यात विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे. त्याला नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीतील संघर्षाचीही किनार आहे. त्यामुळे शिवसेनेचे मंत्री भरतशेठ गोगावले आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांचे अजिबात पटत नाही. त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावरून नेहमीच कळीचा मुद्दा उपस्थित होत असतो. खा. सुनील तटकरे आणि रायगडातील सेनेचे आमदार एकत्र येतील अशी आजच्या क्षणाला जरी शक्यता धूसर असली तरीही एकूणच राज्यातील महायुतीचा माहोल पाहता रायगड जिल्हा परिषद निवडणुकीतही युती होऊ शकते किंवा मैत्रीपूर्ण लढतही होऊ शकेल. जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक म्हणजे मिनी विधानसभा म्हटली जाते. जरी विधानसभा निवडणूक २०२९ मध्ये म्हणजे आणखी तीन वर्षांनी होणार असल्या तरीही जिल्हा परिषद, समिती निवडणुकीत सर्वसामान्य कार्यकर्ता आपल्या भागात कार्यकर्त्यांचे संघटन करत असतो. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका या पक्षीय संघटनात्मक दृष्ट्याही महत्त्वाच्या मानल्या जातात. त्यामुळेही या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांना मोठं महत्त्व प्राप्त झालेलं असते. रत्नागिरी - सिंधुदुर्ग जिल्ह्यात भारतीय जनता पक्ष, शिवसेना शिंदेगट यांची युती होऊ शकते. सोबत राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय देखील असेलच. तसे पाहता महायुतीची मोर्चेबांधणी गेले दोन दिवस कोकणात सुरू झाली आहे. महायुतीच्या माध्यमातून निवडणुकांना सामोरे गेल्यास निवडणुकीत चांगले यश मिळू शकते. त्यामुळेच कोणत्याही स्थितीत युती करण्याच्या निर्णयावर महायुतीतील घटक पक्षांमध्ये एकमत झालं आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीतील घटकपक्ष असलेल्या राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवारगट आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या घटकपक्षांचा समावेश असलेल्या महाविकास आघाडी आजही पराभवाच्या धक्क्यातून सावरलेली नाही. नगरपालिका निवडणुकीत कोकणात महाविकास आघाडी कुठे दिसलीच नाही. शहरी भागात महाविकास आघाडीची ही अशी अवस्था झाली आहे. हे कमी म्हणून की काय राज्यातील निवडणूक निकालानेही महाविकास आघाडीत काहीशी संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. महाविकास आघाडीतील घटकपक्षांमध्ये समन्वयाचा अभाव आहे. त्याचबरोबर निवडणुकीपुरते कार्यकर्ते लोकांसमोर जातात. इतरवेळी कार्यकर्ते कुठे दिसतच नाहीत. कोकणात उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून कार्यकर्त्यांना पक्षीय काम करावेसे वाटेल अशी कोणतीही उत्साहवर्धक स्थिती नाही. त्यामुळेच कोकणात मागे पार पडलेल्या निवडणुकीत महाविकास आघाडी कुठे दिसलीच नाही. त्यामुळे जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत उतरण्याची मानसिकताही महाविकास आघाडीकडे नाही. कोकणात काही भागात महाविकास आघाडीतील काही मोजके कार्यकर्ते स्वतः कार्यरत असल्याने ते या निवडणुकीत निवडणूक लढविण्यासाठी प्रयत्न करतील. महाविकास आघाडीकडे कार्यकर्त्यांचे आवश्यक असणारे बळ नसल्याने त्यांचा फारसा प्रयत्न असणार नाही. कोकणातील चारही जिल्ह्यात राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची ताकद अगदीच क्षीण होत चालली आहे. नगरपालिका निवडणुकीत राजापूर नगरपालिकेत जे यश कॉंग्रेसला मिळाले ते यश कॉंग्रेस पक्षाचे नव्हे, तर ते यश हे राजापूर नगरपालिकेत नगराध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या ॲड. हुस्नबानो खलीफे यांचेच आहे. वैयक्तिक स्तरावर नगराध्यक्ष खलिफे यांचा जो जनसंपर्क राहीला त्यामुळे एकीकडे कोकणात चित्र वेगळे असताना मात्र राजापूरला ॲड. खलीफे या निवडणुकीत यश मिळवू शकल्या.त्या-त्या जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांपुरते पक्षाचे अस्तित्व राहीलं आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडे कोणाचा पायपोस कुणाचा नाही, अशी स्थिती आहे. कोणत्याही निवडणुका लढविण्यासाठी आवश्यक असते ते कार्यकर्त्यांचे पाठबळ. महाविकास आघाडीकडे कार्यकर्तेच दिसतही नाहीत आणि उरलेही नाहीत. शेवटी सत्तेच्या विरोधात कितीकाळ विरोधी पक्षाची भूमिका घेऊन उभं रहायचा असा प्रश्न कार्यकर्त्यांना सातत्याने संभ्रमित करतो. याच संभ्रमावस्थेत कोकणातील महाविकास आघाडी मुंबईसह राज्यातील विविध महानगरपालिका निवडणुकीत दुभंगली आहे. पार पडलेल्या निवडणुकीत 'एकला चलो रे'चा नारा देत महाविकास आघाडीतील घटक पक्षांची वाटचाल सुरू असल्याने साहजिकच या निवडणुकीत कोकणात तरी भाजप, शिवसेना(शिंदे) गट, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवारगट) आरपीआय या घटक पक्षांच्या महायुतीसमोर आव्हान उभे करण्याची मानसिकता महाविकास आघाडीमध्ये नाही. यामुळेच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीत महायुती कोकणात निवडणुकीची जी मोर्चेबांधणी करीत आहे. ती यशस्वी होणारी आहे. रायगड जिल्ह्यात थोडफार प्रमाणात महाविकास आघाडीतील शेतकरी कामगार पक्ष निवडणुकीत दिसू शकेल. येत्या दोन-तीन दिवसात कोकणातील राजकीय चित्र अधिक स्पष्ट होईल.

# टोमॅटोची व चिंचेची चटणी

**साहित्य :** अर्धा किलो टोमॅटो, ५-७ लसणाच्या पाकळ्या, अर्धी वाटी तेल, चमचाभर मोहरी, आवडीनुसार तिखट व मीठ, थोडासा चिंचेचा गाळलेला कोळ, अर्धा चमचा मेथी दाणे, थोडासा कढीपत्ता व हिंग, दोन चमचे साखर.

**कृती :** सर्वप्रथम कढईत तेल घालून हिंग व मेथी परतून घ्या. त्याची पावडर करा. लसूण आणि टोमॅटोही मिक्सरमध्ये घालून त्याची पेस्ट करून घ्या. ती पेस्ट घट्ट होईपर्यंत शिजवा. आता एका कढईत जास्त तेल घालनू त्यावर मोहरी व कढीपत्त्याची फोडणी तयार करा. त्यात चिंचेचा कोळ, हिंग, मेथीची पावडर, मीठ, तिखट घाला. कोळ शिजू लागला की टोमॅटोची पेस्ट व साखर घालून पाच मिनिटे शिजवा.



# डान्स करताय? हे फायदे समजून घ्याच

**नृत्य हे मन, शरीर आणि आत्मा यांच्यासाठी समग्र क्रियाकल्प आहे. नृत्य एक शारीरिक क्रियाकल्प आणि सर्जनशील भावनेच्या माध्यमातून वापरल्याने, ऊर्जा कुशलतेने हाताळण्यास मदत करते आणि यामध्ये नृत्य आर्ट कौशल्य, ज्ञान आणि समज विकसित होण्यास मदत शिकण्यासोबतच लोक काही तरी शोधत असतात आणि त्यांना ॲक्टिव्हिटीमध्ये सहभागी होतात. ज्या लोकांना अंतर्दृष्टी समजून त्यांना स्वतःला व्यक्त करण्यासाठी एक प्लॅटफॉर्म मिळते आणि त्यांचे सकारात्मकरीत्या परिवर्तित होते. निर्माण होणारी आणि परफॉर्मिंग होते. नृत्य आवडणाऱ्या घ्यायची असते व्यक्तिमत्त्व**



**सध्याच्या** काळामध्ये आपला बहुमूल्य वेळ तंत्रज्ञान आणि सोशल मीडिया घेते, तेव्हा नृत्य हा एक असा छंद आहे जेथे एखादी व्यक्ती शिकू शकते, आनंद घेऊ शकते आणि त्याच वेळी कामही करू शकते. प्रत्येक वर्गामध्ये फिटनेस लेवल, आत्मविश्वास, लक्ष केंद्रित करणे, एकाग्रता, सांघिक भावना, सकारात्मक विचार, शिस्त, शरीराची ठेवण असे सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले जाते. डान्स नेहमी स्वच्छ वातावरणात शिकला जातो त्यामुळे मनही प्रसन्न राहते. प्रत्येक विद्यार्थ्याला किंवा ग्रुपकडे समान लक्ष दिल्याने समानतेची भावना मिळते. नृत्य शिकत असताना फक्त शारीरिक क्रियाकल्प करत नाहीत तर यामधून आत्मविश्वास वाढतो, रक्त अभिसरण प्रक्रिया सुधारते, मांसपेशी मजबूत होतात आणि वजन वाढते; चांगले समन्वय आणि कौशल्य विकसित होते. नृत्य हे शरीरातील ऊर्जा आणि भावना बाहेर सोडण्याचा एक चांगला मार्ग आहे. जेव्हा आपण नृत्य करतो तेव्हा घाम येतो आणि घामाद्वारे चांगले वाटणारे एण्डॉर्फिन बाहेर उत्सर्जित होते, ज्यामुळे आपल्याला आनंदी वाटते. चांगले संगीतही मनाला शांती देते. नृत्य हे संगीताला जिवंत रूप देण्याचे काम करते. शिकण्याची पद्धत ही परस्पर संवादात्मक असल्याने शिक्षण प्रक्रिया तणावमुक्त आणि अधिक मजेदार असते.

माझ्यासाठी आरोग्य ही एक मनाची स्थिती आहे आणि फिटनेस हा जगण्याचा मार्ग. तंदुरुस्त शरीरामध्ये निरोगी मन असते. नृत्य संपूर्ण फिटनेस, सहनशक्ती आणि स्नायूंची बळकटी तसेच संपूर्ण शरीरामध्ये ताकद वाढवण्यास मदत करते. यात कार्डियो व्हॅस्क्युलर / एरोबिक फिटनेस, कोर आणि शरीरातील लवचिकतेसाठी स्ट्रेचिंगचा समावेश केला जातो. ग्रुपमध्ये एकत्रितपणे काम केल्याने संघाचे महत्त्व तसेच सांघिक भावना वाढते. नृत्यासाठी भरपूर सहनशक्ती आवश्यक असते जी शरीर चपळ बनवण्यास मदत करते. अशा प्रकारे नृत्य मधून मनःशांती, एकाग्रता, चपळता, तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यास मदत असे अनेक प्रकाचे फायदे होतात.

# रिकाम्या पोटी प्या गुळ-जिऱ्याचे पाणी आरोग्यास ठरेल लाभदायक

**प्रत्येकाच्या घरी स्वयंपाकघरामध्ये जिरे सहज उपलब्ध होते. जिऱ्याचा वापर अनेक भाज्या बनवताना केला जातो. जिऱ्यामुळे अन्न पचायला मदत होते. तसेच गुळदेखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. हिवाळ्यात गुळाचे सेवन केल्याने आरोग्याला अनेक फायदे होतात.**

गुळ आरोग्यासाठी एक वरदान मानला जातो. आयुर्वेदातही गुळाचे महत्त्व सांगितलेले आहे. आपल्याला माहीत आहे की, गुळ आणि जिरे आपल्या आरोग्यासाठी किती फायदेशीर आहे? चला जाणून घेऊयात याचे शरीराला होणारे फायदे...

**ॲनिमिया रुग्णांसाठी फायदेशीर :** गुळ आणि जिऱ्याचे पाणी पिण्याने ॲनिमिया किंवा रक्ताची कमी भरून निघण्यास फायदेशीर ठरते. तसेच रक्तामधील अशुद्धता दूर होते.

**डोकेदुखीपासून आराम :** थंडीमध्ये बऱ्याच लोकांना डोकेदुखीचा त्रास जाणवतो. अशावेळी गुळ-जिऱ्याचे पाणी पिण्याने फायदा होतो.

**कंबरदुखीवर फायदेशीर :** हिवाळ्यात अनेकांना कंबरदुखीचा त्रास होतो. जर गुळ आणि जिऱ्याचे पाणी घेतल्याने कंबरदुखीपासून आराम मिळतो.

**रोगप्रतिकार क्षमता वाढवते :** गुळ आणि जिरे आपल्या शरीरात घाण साफ करण्यासोबतच शरीराची रोग प्रतिकारक क्षमता वाढवण्यास मदत करते.

**मासिक पाळीच्या त्रासापासून आराम :** गुळ आणि जिऱ्याचे पाणी घेतल्याने अनियमित मासिक पाळी आणि पोटदुखीच्या समस्या दूर होतात.

**गुळ आणि जिऱ्याचे पाणी कसे बनवावे**

एका वाडग्यात दोन कप पाणी घ्या. यामध्ये एक चमचा गुळाचा चुरा आणि एक चमचा जिरे टाकून चांगली उकळी घ्या. यानंतर हे पाणी कप घेऊन पिऊ शकता. मात्र लक्षात ठेवा, हे पाणी सकाळी रिकाम्या पोटी घेणे आवश्यक आहे.



**एलएलएम इन एन्व्हायरमेंटल लॉ हा पूर्णवेळ पीजी प्रोग्राम आहे ज्यामध्ये २ वर्षांचा कालावधी आहे ज्यामध्ये पर्यावरण संरक्षण, हवामान बदल संरक्षण आणि नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर यासाठी स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर फ्रेमवर्क समाविष्ट आहे. या अभ्यासक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरण कायद्याशी संबंधित विषय जसे की जल कायदा, व्यवसाय आणि व्यापार, विविध प्रकारचे प्रदूषण, जमिनीचे प्रश्न, पर्यावरणीय न्याय इत्यादी विषय शिकवले जातात.**




# एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ (पर्यावरण कायदा) मध्ये करिअर बनवा, पात्रता, अभ्यासक्रम, शीर्ष महाविद्यालय, व्याप्ती जाणून घ्या

**पात्रता :** उमेदवारांनी मान्यताप्राप्त महाविद्यालय किंवा विद्यापीठातून पदवी + एलएलबी किंवा बीएएलबीमध्ये बॅचलर पदवी असणे आवश्यक आहे. एलएलबी पदवीमध्ये उमेदवाराला एकूण किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे. उमेदवारांनी त्यांच्या पसंतीच्या महाविद्यालयांमध्ये जागा मिळवण्यासाठी CLAT-PG/AILET/DU LLM/ MHCET कायदा/LSATसारख्या कोणत्याही एक सामान्य प्रवेश परीक्षेतही पात्र असणे आवश्यक आहे. एसटी/एससी आणि ओबीसीमधील उमेदवारांना अनिवार्य प्रक्रिया म्हणून कोर्स प्रोग्राममध्ये ५ टक्के सूट दिली जाते.

**प्रवेश प्रक्रिया :** कोणत्याही सर्वोच्च विद्यापीठात एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ कोर्समध्ये प्रवेश घेण्यासाठी उमेदवारांना प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे. प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, एक वैयक्तिक मुलाखत आहे आणि जर उमेदवारांनी त्यात चांगले गुण मिळवले तर त्यांना शिष्यवृत्ती देखील मिळू शकते.

**नोंदणी :** उमेदवार अधिकृत वेबसाइटवर जातात. अधिकृत वेबसाइटला भेट दिल्यानंतर अर्ज भरा. अर्ज भरल्यानंतर तो नीट तपासून घ्या, जर फॉर्ममध्ये चूक असेल तर तो नाकारला जाऊ शकतो. विनंती केलेली कागदपत्रे अपलोड करा. अर्ज सादर करा. क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्डद्वारे ऑनलाइन फॉर्म फी भरा.

**टप्पा २ : प्रवेश परीक्षा :** जर उमेदवारांनी एलएलएम एन्व्हायरमेंटल लॉ मध्ये प्रवेश घेण्यासाठी उच्च विद्यापीठांचे लक्ष्य ठेवले असेल, तर त्यांच्यासाठी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण करणे खूप महत्त्वाचे आहे. ज्यासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रवेशपत्र जारी केले जातात. ज्यामध्ये प्रवेश परीक्षेशी संबंधित सर्व माहिती दिली जाते जसे की परीक्षा कधी आणि कुठे होणार आहे, इत्यादी. एलएलएम बिझनेस लॉची प्रवेश प्रक्रिया CLAT-PG/AILET/ DU LLM/MHCET Law/LSAT इत्यादी प्रवेश परीक्षेवर अवलंबून असते. पात्र उमेदवारांची पुढील मुलाखतीच्या आधारे निवड केली जाते. प्रवेश परीक्षा झाल्यानंतर काही दिवसांनी, त्याचा निकाल जाहीर केला जातो, त्यासाठी विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या वेबसाइट्स आणि सोशल मीडिया हँडलची नियमितपणे तपासणी करून स्वतःला अपडेट ठेवले पाहिजे. जे विद्यार्थी प्रवेश परीक्षेत पात्र ठरतील त्यांना विद्यापीठातर्फे मुलाखतीसाठी हजर राहण्यास सांगितले जाईल - एकतर ऑनलाइन (स्काईप, गुगल मीट, झूम) किंवा ऑफलाइन विद्यार्थ्यांना विद्यापीठ कॅम्पसमध्ये बोलावून. दरम्यान, इतर सर्व पात्रता निकषांची तपासणी केली जाते आणि जर विद्यार्थ्यांनी मुलाखतीत चांगली कामगिरी केली तर त्यांना एन्व्हायरमेंटल कायद्यातील एलएलएमचा अभ्यास करण्यासाठी प्रवेश दिला जातो.

**अभ्यासक्रम**

- मॉड्यूल I निसर्ग आणि पर्यावरण कायद्याची व्याप्ती
- मॉड्यूल II आंतरराष्ट्रीय कायदा आणि पर्यावरण संरक्षण
- मॉड्यूल III भारतातील पर्यावरण कायद्याचा इतिहास व विकास
- मॉड्यूल IV भारतीय संविधान अंतर्गत पर्यावरण संरक्षण
- मॉड्यूल V पर्यावरण संरक्षण, सामान्य नागरी, फौजदारी कायदा
- मॉड्यूल VI भारतातील पाणी, हवा आणि पर्यावरणाचे संरक्षण
- मॉड्यूल VII वन, वन्यजीव आणि जैवविविधतेचे संरक्षण
- मॉड्यूल VIII पर्यावरण कायद्यातील उदयोन्मुख समस्या

**शीर्ष महाविद्यालये**

- तामिळनाडू डॉ. आंबेडकर लॉ युनिव्हर्सिटी, तामिळनाडू
- हिदायतुल्ला राष्ट्रीय कायदा विद्यापीठ, रायपूर
- राष्ट्रीय कायदा विद्यापीठ आणि न्यायिक अकादमी, आसाम
- टेरी युनिव्हर्सिटी, नवी दिल्ली

# वजन घटवण्यासाठी 'पीनट बटर' उपयुक्त

**सँडविचमध्ये** लावण्यासाठी एक अतिशय पौष्टिक 'स्प्रेड' म्हणून 'पीनट बटर' म्हणजेच शेंगदाण्यांपासून तयार केले गेलेले बटर अतिशय लोकप्रिय होऊ लागले आहे. अतिशय पौष्टिक तत्त्वांनी परिपूर्ण असे पीनट बटर वजन घटवण्यासाठीही उपयुक्त असल्याचे आहारतज्ज्ञ म्हणतात. पीनट बटरमध्ये असणारी प्रथिने, जीवनसत्त्वे आणि क्षार वजन घटवण्यास सहाय्यक आहेत. पीनट बटरच्या सेवनाने भूक लवकर शमत असून, त्यामुळे अन्नाचे सेवन आपोआपच कमी होते. याच्या सेवनाने शरीराची चयापचय शक्ती वाढत असून, त्यामुळेही वजन घटण्यास मदत होते. पीनट बटर पोळीबरोबर, भाकरीबरोबर किंवा गव्हापासून तयार केलेल्या ब्रेडसोबत खाता येऊ शकते. फळे किंवा कच्च्या भाज्यांच्या कापांच्या सोबतही हे बटर खाता येते. सकाळच्या नाश्त्यामध्ये ओटमिल घेत असल्यास किंवा दह्यामध्ये मिसळूनही पीनट बटरचे सेवन करता येते. मात्र वजन घटवताना पीनट बटर आहारामध्ये समाविष्ट करताना त्यामध्ये इतर 'ॲडीटिव्ह' असणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक आहे. पीनट बटर बाजारातून आणण्यापेक्षा घरी तयार करणे अधिक चांगले. हे बटर बनवण्यासाठी शेंगदाणे भाजून घ्यावेत आणि त्यांची साले काढून घ्यावीत. त्यानंतर शेंगदाणे मिक्सरमध्ये घालून थोडेसे शेंगदाण्याचे तेल घालावे, त्यानंतर मिक्सर सुरू करून शेंगदाणे तीन ते चार मिनिटे मिक्सरवर वाटावेत. तयार झालेल्या शेंगदाण्याच्या पेस्टला पीनट बटर म्हटले जाते. यामध्ये चवीला थोडेसे मीठ घालावे. तसेच आवडत असल्यास किंचित मध आणि दालचिनीची पूडही यामध्ये घालता येऊ शकते.



**सुंदर, नितळ, गोरी त्वचा कोणाला नको असते. यासाठी लोक चेहऱ्यावर विविध प्रयोग करत असतात. मात्र कांदा आणि लसूणचा फेसपॅक तुम्ही कधी ट्राय केलाय का?**





# चेहरा उजळण्यासाठी कांदा आणि लसणाचा फेसपॅक

**त्वचा उजळण्यासाठी लसूण फायदेशीर :** लसूणमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन बी६, सेलेनियम, झिंक असते. त्वचेवरील मुरुमे हटवण्यासाठी लसूण फायदेशीर आहे. लसणाच्या पेस्टमध्ये मध मिसळून हा पॅक लावल्यास चेहऱ्यास फायदा होता. पिंपल्सच्या जागी लसूणचा रस लावा, पिंपल्स लवकर बरे होतील आणि डाग राहणार नाहीत.

**त्वचेसाठी वरदान आहे कांदा :** कांद्यामध्ये अनेक व्हिटॅमिन असतात. याशिवाय अँटीऑक्सिडंट्सही असतात. कांद्याच्या रसात अँटी सेप्टिक, अँटी-बॅक्टेरियल यासारखे गुण असतात. ज्यामुळे त्वचेवरील मुरुमे निघून जातात.

**कसा करावा वापर :** तुम्ही रोजच्या डाएटमध्ये कच्च्या कांद्याचा वापर करू शकता. कांदा त्वचेसाठी चांगला. याशिवाय तुम्ही कांदा किसून त्याचा फेसपॅक बनवून वापरू शकता. तसेच कांद्याच्या रसाचाही वापर करू शकता.

# घरगुती लिपस्टिक तयार करणे इतके सोपे

**बाजारात** मिळणारे कॉस्मेटिक महाग तर असतातच पण आपल्या स्कीनवर विपरित परिणाम करणारे असतात. त्यातून ओठ हे तर सर्वात नाजूक असतात, यावर रोज बाजारातील लिपस्टिक लावली तर ओठ काळे पडू लागतात. म्हणून येथे आम्ही सोपी पद्धत सांगत आहोत ज्याने आपण घरी लिपस्टिक तयार करू शकता.



**साहित्य :** एक बीट, १/२ कोकोनट ऑइल, १/२ चमचा मधमाश्यांचे मेण, १/२ चमचा कोको बटर

**कृती :** बिटाचे पातळ काप करून वाळू द्या. डिहायड्रेटरमध्ये हे काप १२० डिग्रीवर ८ तास ठेवून वाळवू शकता. नंतर मिक्सरमधून वाटून पावडर तयार करा. मंद आचेवर एका भांड्यात अर्धा ते १ कप पाणी टाकून त्यात मेण, कोकोबटर, कोकोनट ऑइल आणि बीट पावडर मिसळा. चांगले ढवळा. गडद रंगासाठी अधिक पावडर किंवा वाळलेल्या चेरीज वापरू शकता. घट्ट झाल्यावर मऊ कपड्याने गाळून घ्या. लिप कंटेनरमध्ये हे मिश्रण ओतून घ्या. थंड होऊ द्या. आपले लिपस्टिक तयार झाले. हे पूर्णपणे नैसर्गिक असल्यामुळे ओठ काळे पडणार नाहीत.

# 'ब्लॅक टी'चे असेही फायदे

**ब्लॅक** टीमुळे शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. भारतात सर्वाधिक प्यायले जाणारे पेय म्हणून चहाचा पहिला क्रमांक लागतो. चहा, कॉफी म्हटले की अनेक जण दुधाचा चहा, कॉफीला पसंती देतात. दुधाच्या चहाच्या तुलनेत खूप कमी लोकांना ब्लॅक टी आवडते. तुलनेने ब्लॅक टी चवीला चांगली लागत नसली तरी तिचे अनेक फायदे आहेत. बाजारात अनेक प्रकारच्या ब्लॅक टी उपलब्ध आहेत. घरात बनवली जाणरी ब्लॅक टी लिंबू रस टाकून घेता येते. बाजारात इंग्लिश ब्रेकफास्ट टी, अर्ल ग्रे टी, आसाम टी, दार्जिलिंग टी, निलगिरी टी असे चहाचे अनेक प्रकार उपलब्ध आहेत.



काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीत एक संशोधन करण्यात आले होते. या संशोधनाचा अहवाल युरोपियन जर्नल ऑफ न्यूट्रिशनमध्ये पब्लिश करण्यात आला होता. या अभ्यासानुसार ब्लॅक टीमध्ये विविध प्रकारचे विशेष तत्त्व असल्याचे सिद्ध झाले आहे. ब्लॅक टीमधील चहाचे विशेष तत्त्व पोटात जाऊन मोठा प्रभाव पाडतात. ब्लॅक टीमुळे वजन घटवण्यास मदत होते. तसंच शरीरातील टॉक्सिंस, विषारी घटक बाहेर निघण्यास मदत होते. विषारी द्रव्ये शरीरातून बाहेर निघाल्यामुळे कोणताही आजार बळावण्याची शक्यता कमी होते.

टॉक्सिंस शरीरातून बाहेर पडल्यामुळे आरोग्यही उत्तम राहण्यास मदत होते.

चहात अँण्टी ऑक्सिडेंट सर्वाधिक असतात. अनेक संशोधनांतून संशोधकांनी ब्लॅक टी आणि ग्रीन टीमध्ये प्रोबायोटिक्स तत्त्व आढळून येत असल्याचे सांगितले आहे. प्रोबायोटिक्स तत्त्व शरीरात प्रतिरोधक सूक्ष्मजीवांच्या वाढीसाठी मदत करतात. ब्लॅक टी वजन नियंत्रणात ठेवून अनेक आजारांपासून बचावही करते.

ब्लॅक टीमध्ये दूध आणि साखर नसल्याने शरीरात फॅट जमा होत नाही. चहातील अँण्टीऑक्सिडेंट शरीरातील अतिरिक्त चरबी न वाढू देण्याचे काम करते. एका संशोधनातून दिवसांतून तीन वेळा ब्लॅक टी पिण्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहत असल्याचे समोर आले आहे. डोकेदुखी होत असल्यास ब्लॅक टीमध्ये लिंबू टाकून प्यायल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.



**दररोज पुढे जाण्याच्या शर्यतीत प्रत्येक व्यक्ती धकाधकीचं आयुष्य जगत आहे. लवकर पुढे जात लवकर यश मिळवण्याच्या नादात अनेक जण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. सोपं, लवकर आणि जिभेच्या चवी पुरवण्यासाठी अनेक जण फास्ट फूडच्या आहारी गेले आहेत. या फास्ट फूडमुळेच अनेक जण लठ्ठपणाचे शिकार होत आहेत. अशाप्रकारे आलेला लठ्ठपणा कमी करणं तितकंसं सोपं नाही. लठ्ठपणामुळेच शरीरात अनेक प्रकारचे विकार बळावतात. अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा असून शरीरातील लठ्ठपणामुळेच अनेक आजारांना निमंत्रण दिले जाते.**



# अनेक आजारांचे कारण लठ्ठपणा; असे ठेवा नियंत्रण

लठ्ठपणाचे निदान व्यक्तीच्या शारीरिक तपासणी आणि त्याच्या इतिहासावर अवलंबून आहे. लठ्ठपणामुळे आलेल्या रोगांची शक्यता तपासण्यासाठी व्यक्तीच्या 'बीएमआय' बॉडी मास इंडेक्सचे मापन केले जाते. आई-वडिलांपैकी एकाला लठ्ठपणा असल्यास मुलांमध्येही लठ्ठपणा होण्याची शक्यता असते. कॅलरीयुक्त आहार, जंक, फास्ट फूड, पेय पदार्थांचे अधिक सेवन यामुळे लठ्ठपणाची समस्या निर्माण होण्यास सुरुवात होते. फळं, भाज्या यांच्या कमी सेवनानेही व्यक्ती लठ्ठपणाचा शिकार होऊ शकतात. लठ्ठपणामुळे स्ट्रोक, कॅन्सर, प्रजनन क्षमता कमी होणे, ऑस्ट्रियोआर्थराइटिस, टाइप २ डायबिटीज, पित्ताशयाचे आजार, उच्च रक्तदाब, लिवरला सूज येणे, श्वास घेण्यास अडथळा, नर्व डिस्ऑर्डर यासारखे गंभीर आजार होण्याची शक्यता असते. यासारखे आजार बळावू नये यासाठी नियमित व्यायामाने वजन नियंत्रणात ठेवू शकता. जोरात चालणे, पोहणे, सायकल चालवणे यासारखे व्यायाम करू शकता. दिवसांतून तीन वेळा नियमित आहार घ्या. काही लोक भूक लागण्यावर कोणत्याही वेळी खातात. वेळ न पाहता गोड पदार्थ आणि फास्ट फूड खातात. त्यामुळे लठ्ठपणा वाढीस लागतो. कमी कॅलरीयुक्त आहार, फळं, भाज्या, कडधान्यांचे सेवन करा. मिठाई, अल्कोहलचे सेवन अगदी कमी प्रमाणात करा. अतिरिक्त चरबी वाढवणारे पदार्थ खाण्यापासून लांब राहा. दिवसभरात आवश्यक तेवढे पाणी प्या. काकडी, लिंबू, आलं, पुदिन्याचा रस वजन कमी करण्यास मदत करतात. विशेषतः पोटातील फॅट कमी करण्यास या फळांचा रस फायदेशीर ठरतो. फॅट कमी करण्यासाठी ग्रीन टी, दही, डाळी, ओट्स, अंडी अशा पदार्थांचे सेवनही लाभदायक ठरते.

# कच्च्या केळ्याचे सेवन अनेक विकारांवर उपयुक्त

**पिकलेली** केळी आपल्या आहारामध्ये नेहमीच समाविष्ट असून, या फळाचे आपल्या आरोग्याच्या दृष्टीने असणारे फायदे आपल्या परिचयाचे आहेत. पोटॅशियम आणि क्षार मुबलक असणारे हे फळ पचण्यास हलके आहे. याच्या सेवनाने शरीरामध्ये त्वरित ऊर्जा उत्पन्न होत असते. म्हणूनच व्यायामापूर्वी एखादे केळे खाण्याचा सल्ला आहारतज्ज्ञ देत असतात. पिकलेल्या केळ्यांप्रमाणे कच्चे केळे देखील भाजी, भजी, कोफ्ते इत्यादी पदार्थ बनवण्याकरिता वापरले जात असते. पिकलेल्या केळ्यांप्रमाणेच कच्च्या केळ्याचे सेवनही आरोग्याच्या दृष्टीने अतिशय फायदेशीर म्हटले जाते. कच्च्या केळ्यांमध्ये फायबर आणि हेल्दी स्टार्च असून, ही तत्त्वे आतड्यांमध्ये कोणत्याही प्रकारचे 'ब्लॉकेज' उत्पन्न होऊ देत नाहीत. त्याचमुळे ज्यांना बद्धकोष्ठाचा त्रास आहे, त्यांनी कच्च्या केळ्यांचा समावेश आहारामध्ये अवश्य करावा. ज्यांना मधुमेह आहे, किंवा ज्यांना मधुमेह असल्याचे नुकतेच निदान झाले आहे, त्यांच्यासाठी कच्च्या केळ्याचे सेवन फायदेशीर आहे. याच्या सेवनाने शरीरातील ब्लड-शुगरची पातळी नियंत्रणात राहते. कच्च्या केळ्यामध्ये फायबरची मात्रा मुबलक असून, याच्या सेवनाने पोट अधिक काळ भरलेले राहते व त्यामुळे वारंवार भूक लागण्याची भावना होत नाही. याच्या सेवनाने पचनक्रियाही उत्तम राहते. त्यामुळे ज्यांना वारंवार अपचनाचा त्रास होतो, त्यांनी आपल्या आहारामध्ये कच्च्या केळ्याचा समावेश अवश्य करावा.



# जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील शेतकरी, आदिवासी, कामगार, महिला, युवक व विद्यार्थ्यांचा अतिभव्य पायी मोर्चा



या ऐतिहासिक मोर्चात अखिल भारतीय किसान सभा (एआयकेएस), सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटू), अखिल भारतीय जनवादी महिला संघटना (एडवा), डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया (डीवायएफआय), स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (एसएफआय) तसेच आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच (एएआरएम) या संघटनांचा मोठ्या संख्येने सहभाग आहे. या मोर्चाचे नेतृत्व माकपचे पॉलिट ब्युरो सदस्य व अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, पॉलिट ब्युरो सदस्य व अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे, माकप राज्य सचिव व किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव डॉ. अजित नवले, केंद्रीय समिती सदस्य व सीटूचे राज्य सचिव तसेच डहाणूचे माजी आमदार विनोद निकोले, राज्य सचिवमंडळ सदस्य व आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंचाचे राज्य निमंत्रक किरण गहला यांच्यासह अनेक प्रमुख नेते करत आहेत. मंगळवारी माकपचे पॉलिट ब्युरो सदस्य व अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सरचिटणीस विजू कृष्णन हे देखील या मोर्चात सहभागी होणार आहेत.

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने पालघर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधून आलेल्या हजारोच्या संख्येने शेतकरी, आदिवासी, कामगार, महिला, युवक व विद्यार्थ्यांचा अतिभव्य पायी मोर्चा सोमवारी काढण्यात आला. डहाणू तालुक्यातील चारोटी नाका येथून या मोर्चाला सुरुवात झाली असून, हा मोर्चा रात्री मनोर येथे मुक्काम करणार आहे. मंगळवारी हा जनसमुदाय पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कूच करणार असून, सरकारकडून निश्चित कालमर्यादेसह लेखी स्वरूपात मागण्या मान्य होईपर्यंत अनिश्चित काळासाठी धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा माकपने दिला आहे.

वनाधिकार कायद्याची कठोर अंमलबजावणी, देवस्थान, इनाम, वरकस व सरकारी जमिनी कसणार्यांच्या नावावर करणे, मनरेगा योजना पूर्ववत सुरू करणे, स्मार्ट मीटर योजना रद्द करणे, पेसा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी, चार श्रम संहिता रद्द करणे, वाढवण व मुरबे बंदरांसारखे जनविरोधी प्रकल्प रद्द करणे, पिण्यासाठी व शेतीसाठी पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे, तसेच शिक्षण, रोजगार, रेशन आणि आरोग्य सुविधांमध्ये वाढ करणे या प्रमुख मागण्या आंदोलनातून मांडण्यात येत आहेत.

या भव्य मोर्चात सहभागी झालेल्या जनतेच्या हातात मागण्यांचे फलक, बॅनर्स झळकत असून, शिस्तबद्ध पद्धतीने आणि शांततेत हा मोर्चा पुढे जात आहे. मागण्या मान्य होईपर्यंत कोणतीही माघार घेतली जाणार नाही, असा ठाम निर्धार माकप नेतृत्वाने व्यक्त केला आहे. त्यामुळे पालघर जिल्ह्यातील राजकीय व प्रशासकीय वतुर्ळाचे लक्ष या ऐतिहासिक जनआंदोलनाकडे लागले आहे.

## ‘तेजस’ एक्सप्रेसला अनेक असुविधा, ३ ते ६ तास विलंबाने धावते
## भाडं मात्र ‘प्रीमियम’ दराने, आता प्रवाशांची मोठी मागणी

**■मुंबई । प्रतिनिधी,**

वेगवान आणि आरामदायी सुविधांसाठी ओळखल्या जाणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते मडगाव तेजस एक्स्प्रेसमधील असुविधांमुळे प्रवासी त्रस्त आहेत. सातत्याने होणारा विलंब, बंद असलेली ‘इन्फोटेनमेंट’ सुविधा आणि वाढीव भाडेदर यामुळे तेजस केवळ कागदावरच प्रीमियम ट्रेन ठरत आहे. ‘चेअर कार’ असल्याने प्रवास बसून करावा लागतो. यामुळे गाडीत शयनयान डब्यांची रचना करावी किंवा तेजसऐवजी वंदे भारत चालवावी, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.



गाडी क्रमांक २२११९/२२१२० मुंबई-मडगाव तेजस एक्स्प्रेस सीएसएमटीहून सकाळी ५.५० वाजता सुटते आणि मडगाव येथे दुपारी ३ वाजता पोहोचते. मडगावहून परतीचा प्रवास दुपारी २.३५ वाजता सुरू होऊन सीएसएमटीत रात्री १२.३० वाजता पूर्ण होणे अपेक्षित आहे. मात्र सातत्याने तेजस एक्स्प्रेस तीन ते सहा तास विलंबाने धावत आहे. यामुळे मध्यरात्री पोहोचणारी तेजस पहाटे पोहोचत असल्याने प्रवाशांच्या अडचणीत भरच पडत आहे.

गाडीत ‘चेअर कार’ डबे असल्याने ज्येष्ठ नागरिकांसह, महिला प्रवाशांना विलंबाने पूर्ण होणाऱ्या प्रवासात मनस्ताप सहन करावा लागतो. दुसरीकडे गाडीतील ‘इन्फोटेनमेंट’ सुविधा बंद करण्यात आली आहे. असुविधा असूनही गाडीसाठी ‘प्रीमियम’ दराने प्रवासी भाड्याची आकारणी होते. यामुळे प्रवाशांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

सततच्या विलंबामुळे या गाडीच्या विश्वासार्हतेवर प्रवाशांचा पूर्ण विश्वास उडाला आहे. ‘‘तेजस’ गाडीला ना वेग उरला, ना वेळेची शिस्त. धक्कादायक बाब म्हणजे, या गाडीच्या वक्तशीरपणाची जबाबदारी नेमकी कोणाची, याबाबत रेल्वे प्रशासनच मौन बाळगत असल्याने तेजस एक्स्प्रेसचा वाली कोण,’ असा प्रश्न कोकण विकास समितीचे सदस्य अक्षय महापदी यांनी उपस्थित केला आहे.

तेजस एक्स्प्रेसमध्ये शयनयान आसनांचे डबे जोडावेत किंवा तेजस एक्स्प्रेसऐवजी वंदे भारत गाडी चालवावी. कोकण रेल्वेवरील मर्यादित क्षमता, देखभालीसाठी सुरू असणारे ब्लॉक अशी अपरिहार्य कारणे असली, तरी जादा भाडे भरून प्रवाशांची बैठ्या आसनांमुळे होणाऱ्या त्रासातून सुटका करावी, अशी मागणी प्रवासी संघटनांनी केली आहे.

## समुद्रात पाण्याच्या प्रवाहाचे मोठे रिंगण
### रहस्यमय अन् गूढ वर्तुळ, ज्वालामुखीचा स्फोट होणार? मच्छिमारांमध्ये चिंता

**■पालघर । प्रतिनिधी,**

वसई किनाऱ्यापासून काही किलोमीटर अंतरावर समुद्रात काहीतरी गूढ घडत असल्याचे संकेत मिळत आहेत. समुद्राच्या पोटात नेमकं काय सुरु आहे? हे आपल्याला सहज समजू शकत नाही. कारण जितका तो अथांग आहे, खोल आहे, तितकाच तो गूढही आहे. या समुद्रात अनेक जीव सहवास करतात. तसेच अनेक जण बोटीतून समुद्राच्या या किनाऱ्यापासून दुसऱ्या किनाऱ्यावर जातात. अनेक कोळीबांधव मासेमारी करण्यासाठी समुद्रात जात असतात. ते निर्भिडपणे दूपर्यंत जात खोल समुद्रातून मासेमारी करतात. पण या मासेमारी बांधवांची चिंता वाढवणारी एक बातमी समोर आली आहे. वसईच्या समुद्रात काहीतरी गूढ हालचाली होताना दिसत आहेत. संबंधित घटनेचा व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्यामुळे समुद्रात नेमकं काय घडत आहे? असा प्रश्न उपस्थित होत आहे.



वसई, विरार भागातून मोठ्या संख्येने बोटी मासेमारीसाठी खोल समुद्रात जात असतात. नुकताच वसईच्या पाचूबंदर येथील एक मासेमारी नौका मासेमारीसाठी गेली होती.

यावेळी या बोटीतील सदस्यांना खोल समुद्रात पाण्याच्या प्रवाहाचे मोठे रिंगण तयार झाल्याचे दिसून आले होते. या रिंगणाचा व्हिडीओही समाजमाध्यमांवर प्रसारित होत आहे. या घडलेल्या प्रकारानंतर यंत्रणा सजग झाल्या आहेत. तर मच्छिमार बांधवामध्ये चिंतेचे वातावरण आहे. याची माहिती मत्स्य अधिकाऱ्यांना दिल्यानंतर याबाबत तटरक्षक दल आणि नौदलाला कळवण्यात आले आहे.


दरम्यान, पालघर जिल्ह्यात सातत्याने भूकंपाचे हादरे बसतात. पालघर हे भूकंपाचे क्षेत्र असल्याचं नेहमी बोलले जाते. कारण या ठिकाणी दरवर्षी २०० पेक्षा जास्त सौम्य भूकंपाचे धक्के येत असतात. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालेलं असतं. या दरम्यान, समुद्रात जो वर्तुळ बघायला मिळाला आहे त्याचा संबंध काही जणांकडून थेट पाण्याखालील ज्वालामुखी क्रियाकलापांशी असू शकतो, अशी शंका व्यक्त केली जात आहे.

सागरी जीव बचाव पथकातील सदस्य जनार्दन मेहरे यांनी याबाबत विनंती केली आहे. त्यांनी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष आणि अधिकाऱ्यांना या प्रकरणी तात्काळ चौकशी करण्याची विनंती केली आहे. त्यामुळे आता या प्रकरणी चौकशीनंतर काय माहिती समोर येते ते पाहणं महत्त्वाचं आहे.

## मेट्रोत १६ वर्षाच्या मुलाने फॉरेनर महिलेला केला चुकीचा स्पर्श, म्हणाली, ‘मी इथून पुढं तुमच्या देशात...’

**■मुंबई । प्रतिनिधी,**

दिल्ली मेट्रोत अमेरिकन महिलेसोबत अश्लील कृत्य करण्यात आल्याचं सांगण्यात येत आहे. पीडित महिलेनं दावा केला की, दिल्ली मेट्रो स्टेशनवर एका १६ वर्षीय मुलाने तिचा विनयभंग केला. या प्रकरणात सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या घटनेनंतर, मुलाच्या आई आणि बहिणीने परदेशी महिलेला फटकारले आणि मुलाचा बचाव केला. या घटनेनं परिसर हादरून गेल्याचं सांगण्यात येत आहे.



**'मला तुमचा देश खूप आवडायचा, पण इथून पुढे...'**

संतापलेल्या पीडितेनं मुलाची कॉलर पकडून ढकललं. त्यानंतर मुलाच्या आई आणि बहिणीने पीडितेवरच आरडाओरड करण्यास सुरुवात केली होती. आईने दावा केला की, 'तिच्या मुलाने कधीही परदेशी महिलेला जवळून पाहिले नव्हते आणि त्यामुळे त्याची दिशाभूल करण्यात आली', असं म्हणत पाठीशी घातले. त्या पीडितेनं यावर वक्तव्य केलं की, 'मला तुमचा देश खूप आवडायचा, पण इथून पुढे मी पुन्हा परतणार नाही. खरं तर, मी संपूर्ण दक्षिण आशियेत येणं टाळेन', या घटनेनं सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे.

या घटनेनची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरु झाली आहे, महिलांच्या, विशेषतः परदेशी पर्यटकांच्या सुरक्षेचा प्रश्न आता ऐरणीवर आलाय. न्यू जर्सी येथील स्टीव्हन्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये शिक्षण देणारे भारतीय-अमेरिकन प्राध्यापक गौरव सबनीस यांनी इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर केली होती. त्यांच्याच एका विद्यार्थ्याने पीडितेला भारतात प्रवास करण्याबाबत सल्ला दिला होता. एका मित्राच्या लग्नासाठी फॉरेनर दिल्लीत आली होती. प्राध्यापक सबनीस यांनी तिला दिल्लीत, विशेषतः फॉरेनर महिलांच्या असुरक्षिततेबाबत सांगितलं होतं. ते फॉरेनर असल्याने तुला टार्गेट केलं जाईल, नंतर हे खरं ठरलं.

### १४-१६ वर्षांचा मुलाने पीडितेला केला चुकीचा स्पर्श

पीडितेनं सबनीस यांना पाठवलेल्या एका मेसेजमध्ये संपूर्ण घटनेचं वर्णन केलं. महिलेनं दिलेल्या माहितीनुसार, १४-१६ वर्षांचा मुलगा हा त्याच्या आई आणि बहिणीसोबत मेट्रो स्थानकावर होता. त्याने महिलेला फोटो काढण्यास सांगितला होता. महिलेला वाटले की, ती एका कुटुंबासोबत असल्याने तिच्यासोबत कसलाही चुकीचा प्रकार घडणार नाही, पण त्या मुलाने फोटो काढताना तिच्या खांद्यावर हात ठेवत, नंतर अचानक तिचे गुप्तांग दाबत तिच्या नितंबावर थाप मारली. नंतर तो तिच्याकडे बघून हसू लागला आणि त्याने या कृत्याला अगदी खेळीमेळीत घेतलं.

## मुख्याध्यापकाच्या केबिनमध्येच शिक्षिकेने घेतला गळफास, नातेवाईकांचा गंभीर आरोप

**■मुंबई । प्रतिनिधी,**

सरकारी शाळेतील एका शिक्षिकेने मुख्याध्यापकाच्या केबिनमध्येच गळफास घेतल्याचा हादरवून टाकणारा प्रकार समोर आला आहे. उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील ही घटना आहे. घटनेची माहिती समजताच परिसरातील लोकांनी शाळेत गर्दी केली. गेल्या अडीच वर्षांपासून तिचे सहकारी शिक्षक तिचा मानसिक छळ करत असल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या शिक्षिकेला दोन मुलं असून तिचा नवराही सरकारी शाळेत शिक्षक आहे. उमा वर्मा असं ४० वर्षीय मृत शिक्षिकेचं नाव आहे.



### इतर शिक्षक करायचे टिंगल

शिक्षिकेच्या नव ्याचा आरोप आहे की, उमा वर्मा यांचा लटकलेला मृतदेह पाहून स्टाफ फक्त बघतच राहिला. जर वेळेतच उमा यांना उपचारासाठी नेले असते तर त्या आज जीवंत असत्या. उमा यांच्या भावाने आरोप केला की, माझी बहिण मन लावून शिकवायची. मात्र इतर शिक्षकांना ते बघवायचं नाही. तिची टिंगलटवाळी करायचे. तिला अवॉर्ड जिंकायचा आहे, असं ते म्हणायचे. ज्या केबिनमध्ये गळफास घेतला त्याचा दरवाजा आतून बंदही नव्हता.

**अडीच वर्षांपासून उमा यांचा छळ**

बाराबंकी जिल्ह्यातील हरख विकासखंड येथील कंपोजिट विद्यालय, उदवापूर या शाळेत ही घटना घडली. ४० वर्षीय शिक्षिका उमा वर्मा ह्यांना दोन मुलं असीन त्यांचे पती ऋषी वर्मा हे देखील सरकारी शाळेत शिक्षक आहेत. नातेवाईकांचा आरोप आहे की, ही आत्महत्या नसून मानसिक अत्याचाराचा हा परिणाम आहे. शिक्षिकेच्या नव ्याने सांगितल्यानुसार, 'गेल्या अडीच वर्षांपासून उमा यांचा मानसिक छळ केला जात होता. उमा मन लावून शिकवायची मात्र यावरुनच काही शिक्षक तिची टिंगल करायचे. तिच्याविरोधात संपूर्ण स्टाफ तक्रार करायचा.' आम्ही ट्रान्सफर करायचा प्रयत्न केला मात्र ते शक्य झालं नसल्याचंही ऋषी यांनी सांगितलं.

## १० वर्षीय मुलीसोबत घृणास्पद कृत्य! शाळेत जात असताना बळजबरीने कारमध्ये ओढलं अन्...

**■मुंबई । प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील मेरठ येथे एका १० वर्षीय मुलीसोबत घृणास्पद कृत्य करण्यात आल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. पीडितेचं अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्याचा आरोपींनी प्रयत्न केला. संबंधित घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे. आरोपी तरुण हा दिल्लीत DTC बस ड्रायव्हर म्हणून कार्यरत असल्याची माहिती आहे.

### पीडितेवर बलात्कार करण्याचा प्रयत्न

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. प्रकरणातील पीडिता ही कंकर खेडा पोलीस स्टेशन हद्दीतील रहिवासी असून ती तिसऱ्या इयत्तेत शिकत होती. मुलगी नेहमीप्रमाणे तिच्या शाळेत जात असताना वाटेत एका व्यक्तीने तिच्याजवळ कार थांबवून तिला बळजबरीने गाडीत ओढलं. आरोपीने मुलीला सुमारे दोन तास ओलीस ठेवलं आणि तिच्यावर बलात्कार करण्याचा प्रयत्न केला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने गंभीररित्या जखमी झालेल्या मुलीला रस्त्याच्या कडेला फेकून दिलं आणि घटनास्थळावरून फरार झाला. संबंधित पीडितेच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याचं सांगण्यात येत आहे. सात वर्षांपूर्वीच मुलीच्या वडिलांचं निधन झालं असून तिची आई मजूरी करून कुटुंबियांचा उदरनिर्वाह करते. घटनेनंतर, मुलीची मेडिकल तपासणी करण्यात आली आहे.

संबंधित प्रकरणाचं गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने त्वरीत चार पथके तयार केली. तपासादरम्यान, पोलिसांनी परिसरातील सीसीटिव्ही फुटेज तपासले आणि त्यावरून घटनेत वापरण्यात आलेली कारची ओळख पटवण्यात आली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी भमोरी गावातील रहिवासी असलेल्या फूल कुमार नावाच्या आरोपीला अटक केल्याचं सांगण्यात येत आहे.



आरोपीने पोलिसांच्या चौकशीदरम्यान, त्याचा गुन्हा कबूल केला असून घटनेत वापरण्यात आलेली कार सुद्धा जप्त करण्यात आली आहे. तसेच, आरोपीविरुद्ध अपहरण, विनयभंग आणि पोक्सो ॲक्ट अशा गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीच्या विरोधात आता कायदेशीर कारवाई केली जात आहे.

## समलैंगिक संबंधात अडथळा ठरत असलेल्या पतीचा काटा काढला, महिला प्रियकरासोबत कट रचला

**■मुंबई । प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील फतेहपूर जिल्ह्यात एका शेतकऱ्याची निर्घृण हत्या करण्यात आली होती. दरम्यान या प्रकरणात पोलीस तपासातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. समलैंगिक नात्यात अडथळा ठरत असलेल्या पतीला संपवण्यासाठी पत्नीनेच आपल्या महिला प्रेयसीसोबत मिळून खुनाचा कट रचल्याचे तपासात समोर आले आहे. या हत्येसाठी ६० हजार ६० सुपारी देण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसांनी मृत शेतकऱ्याची पत्नी, तिची महिला प्रेयसी आणि एका साथीदारास अटक केली असून दोन आरोपी सध्या फरार आहेत.


### दीड वर्षांपासून होते समलैंगिक प्रेमसंबंध

अधिकची माहिती अशी की, १४ जानेवारी रोजी असोथर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टीकर गावात शेतकरी सुमेर सिंह यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. हत्या केल्यानंतर आरोपींनी सुमेर सिंह यांचा मृतदेह अरहराच्या शेतात फेकून दिला होता. शेतात मृतदेह आढळल्यानंतर संपूर्ण परिसरात खळबळ उडाली होती. हे प्रकरण खुनाचे असल्याने पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले होते. फतेहपूर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत कॉल डिटेल्स आणि स्थानिक चौकशीच्या आधारे प्रकरणाचा छडा लावला. तपासात उघड झाले की मृतक सुमेर सिंह यांची पत्नी रेनू देवी आणि मालती देवी नावाच्या महिलेचे गेल्या दीड वर्षांपासून समलैंगिक संबंध होते. हे नाते इतके घट्ट झाले होते की दोघींनाही एकत्र स्वतंत्र आयुष्य जगायचे होते.



पोलिसांच्या माहितीनुसार, मालती देवीचे यापूर्वी तीन विवाह झाले होते. तरीही ती वारंवार सुमेर सिंह यांच्या घरी येत असे आणि बहुतांश वेळ रेनू देवीसोबतच घालवत होती. या संबंधांची माहिती सुमेर सिंह आणि त्यांच्या कुटुंबीयांना मिळाल्यानंतर त्यांनी मालती देवीला घरी येण्यास आणि रेनूशी संपर्क ठेवण्यास कडक मनाई केली. यानंतर दोघींनी छुप्या मार्गाने संपर्क सुरू ठेवला. मालती देवीने रेनूला एक लहान कीपॅड मोबाईल फोन दिला होता. या मोबाईलवरून दोघींमध्ये तासन्तास संभाषण होत असे. याच संभाषणांदरम्यान सुमेर सिंह यांना कायमचा संपवण्याचा कट रचण्यात आला.

## पतीने रंगेहात पकडलं अन् जागेवर संपवलं
## ४ महिन्यांपूर्वीच झालेलं लव्ह मॅरेज



**■मुंबई । प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील कानपूर येथून अनैतिक प्रेमसंबंधाचं भयानक प्रकरण उघडकीस आलं आहे. लग्न झाल्याच्या केवळ चार महिन्यांनंतर, पतीने आपल्या पत्नीचा गळा दाबून निर्घृण हत्या केली. आश्चर्याची बाब म्हणजे, दोघांनी एकमेकांसोबत लव्ह मॅरेज झालं होतं. घटनेच्या काही तासांतच आरोपीने पोलीस स्टेशनमध्ये पोहोचून स्वतःला सरेंडर केलं. आता पोलिसांनी मृतदेह पोस्टमॉर्टमसाठी पाठवला असून प्रकरणाचा तपास सुरू आहे. संबंधित घटना ही महाराजपूर पोलीस स्टेशन हद्दीतील रूमा परिसरात घडली.

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी सचिन सिंह हा फतेहपूर जिल्ह्यातील माहनपूर गावाचा रहिवासी आहे. शनिवारी त्याने पोलीस स्टेशनकडे धाव घेतली आणि पोलिसांकडे तक्रार केली. तो म्हणाला की, "मी माज्या पत्नीचा गळा दाबून तिची हत्या केली. हत्येनंतर, तिचा मृतदेह चादरीत गुंडाळून ठेवला आहे." आरोपीचं बोलणं ऐकून पोलिसांना सुद्धा मोठा धक्का बसला. पोलीस कर्मचाऱ्यांनी तातडीने आरोपी तरुणाला ताब्यात घेतलं आणि त्याची चौकशी सुरू केली. चौकशीदरम्यान, सचिनने घडलेली घटना सांगितली आणि त्यावेळी पोलिसांना सुद्धा मोठा धक्का बसला.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी सचिनने चार महिन्यांपूर्वी त्याच्या गावातील श्वेता सिंहसोबत कुटुंबियांच्या विरोधात जाऊन कोर्ट मॅरेज केलं होतं. त्यानंतर, ते दोघे सूरतला निघून गेले आणि तिथे सचिनने एका प्रायव्हेट कंपनीत काम करण्यास सुरूवात केली. मात्र, एक महिन्यानंतर ते पुन्हा कानपूरला परतले आणि महाराजपूरच्या रूमा परिसरात भाड्याच्या घरात राहू लागले. तिथे, सचिन रिक्षा चालवून त्याचा आणि त्याच्या पत्नीचा उदरनिर्वाह करत होता. १३ जानेवारी रोजी तो फतेहपूरच्या चौडगरा येथे गेला होता आणि शनिवारी रात्री जवळपास १ वाजताच्या सुमारास घरी परतला.

मात्र, घरी पोहोचल्यानंतर सचिनने जे काही पाहिलं त्यामुळे तो प्रचंड संतापला. त्याच्या म्हणण्यानुसार, त्याची पत्नी श्वेता दोन तरुणांसोबत अंथरूणावर आक्षेपार्ह अवस्थेत होती. संबंधित तरुण हे जवळच्याच कॉलेजमध्ये इंजीनिअरिंगचं शिक्षण घेत असून ते सचिनच्या घरासमोरच राहायचे. त्यावेळी, रागाच्या भरात आरोपी सचिनने त्यांचा आक्षेपार्ह अवस्थेतील व्हिडीओ रेकॉर्ड करण्याचा प्रयत्न केला. मात्र, श्वेता तसेच तिच्या साथीदारांनी त्याचा मोबाईल हिसकावून घेतला आणि त्याला मारहाण करण्यास सुरूवात केली. घरातील आवाज ऐकून शेजाऱ्यांनी ११२ नंबरवर कॉल केला. त्यानंतर, पोलीस तिथे पोहोचले आणि सगळ्यांना पोलीस स्टेशनमध्ये नेण्यात आलं. तिथे चौकशीनंतर, पोलिसांनी सचिन आणि श्वेताला समजावून घरी पाठवलं आणि इतर दोन तरुणांना ताब्यात घेतलं.

सचिन पुढे म्हणाला की, घरी पोहोचल्यानंतर त्याचं श्वेतासोबत मोठं भांडण झालं. त्यावेळी श्वेताने तिच्या पतीला धमकी दिली की, "सकाळपर्यंत मी त्या मुलांना सोडवून आणेन आणि आता मात्र तू वाचू शकणार नाहीस. तू मला मारून टाकलंस तरी चालेल पण मी त्या मुलांसोबतच राहणार." पत्नीच्या या बोलण्याने सचिनच्या तळपायाची आग मस्तकात गेला आणि त्याने रागाच्या भरात श्वेताचा गळा दाबला आणि त्यात तिचा मृत्यू झाला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com